नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ६ * * अकोला * रविवार, दिनांक ०६ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

आज आषाढी एकादशी सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा






## थोडक्यात..

### लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष

■ **पटना :** लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. शनिवारी पाटणा येथील बाबू सभागृहात झालेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ते २०२८ पर्यंत राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष राहतील.

अधिवेशनाचे अध्यक्षपद पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. रामचंद्र पूर्वे यांनी भूषवले. लालू यादव यांनी २३ जून रोजी पाटणा येथील पक्ष कार्यालयात अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरुद्ध इतर कोणत्याही नेत्याने अर्ज दाखल केला नाही. यानंतर निवडणूक अधिकारी डॉ. पुर्वे यांनी त्यांना बिनविरोध अध्यक्ष घोषित केले.

### पुजाऱ्याने मंदिरात केला दोन मुलींवर बलात्कार

■ **छतरपूर :** मध्यप्रदेशातील छतरपूरमध्ये एका ६० वर्षीय पुजाऱ्यावर मंदिरात दोन मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. मुलींचे कुटुंब मंदिरात पोहोचताच पुजाऱ्याने त्यांच्यावर त्रिशूळाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. लोकांनी त्याला मारहाण केली. पोलिसांनी आरोपी पुजाऱ्याला पॉक्सो अंतर्गत ताब्यात घेतले. ही घटना गढीमलहरा येथील आहे. आरोपी भागवत शरण दुबे हा गावातील महाकाल आश्रम मंदिराचा पुजारी आहे. तो उजरा येथील रहिवासी आहे आणि गेल्या ४ वर्षांपासून आश्रमात राहत आहे. ५ आणि ६ वर्षांच्या चुलत बहिणी घरी जात होत्या. पुजारी दोघांनाही प्रसाद देण्याच्या बहाण्याने मंदिरात घेऊन गेला आणि त्यांच्यावर बलात्कार केला.

### आरोपी नीरव मोदीच्या भावाला अमेरिकेत अटक

**वॉशिंग्टन :** पीएनबी घोटाळ्यातील आरोपी नीरव मोदीचा भाऊ निहाल मोदी याला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. भारताच्या अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) निहालच्या प्रत्यार्पणासाठी अपील केले होते.

## १८ वर्षानंतर ठाकरे बंधूंचे मनोमिलन

# उद्धव, राज एकत्र!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:**

शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे हे दोन चुलत बंधू तब्बल १८ वर्षानंतर एकत्र आले आहेत. राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा शिकवण्याचा घेतलेला निर्णय अखेर मागे घेतला असून, यानंतर ठाकरे बंधूंनी आयोजित केलेल्या विजयी मेळाव्याला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजच्या विजयी मेळाव्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच्यावर सडकून टीका केली. आमच्यात (राज व उद्धव) असणारा आंतरपाट आज अनाजीपंतांनी दूर केला. आम्ही एकत्र आलोत. एकत्र राहण्यासाठी. हे पाहून अनेक बुवा-महाराज आज बिझी आहेत. हिंदीची सक्ती तुमच्या ७ पिढ्या आल्या तरी आम्ही होऊ देणार नाही, असा इशाराही सत्ताधारी भाजपला दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले, आज बऱ्याच वर्षांनंतर राज व माझी भेट व्यासपीठावर झाली. आता पंचाईत अशी आहे की, ते मला सन्माननीय उद्धव ठाकरे असे म्हणाले. आणि साहजिकच आहे की, त्यांचेही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिले आहे. म्हणून मी भाषणाची सुरूवात करताना सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या तमाम मराठी, हिंदू बांधवांनो, भगिनीनो व मातांनो. राज यांनी अप्रतिम मांडणी केली आहे. त्यामुळे माझ्या भाषणाची गरज आहे असे मला वाटत नाही.



ते पुढे म्हणाले, भाषेवरून एखादा विषय निघतो, तेव्हा तो केवळ वरवरचा धरून चालणार नाही. मधल्या काळात अगदी दोघांनी म्हणजे मी व राज काय आपण सर्वांनी या नतद्रष्टांचा अनुभव घेतला आहे. वापराये आणि फेकून द्यायचे. आता आम्ही दोघे मिळून तुम्हाला फेकून देणार आहोत. आजपर्यंत वापर करून घेतलात, अरे डोक्यावर शिवसेनाप्रमुख नसते तर तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत होते. कोणत्या भाषेत बोलत होतात. राज यांनी सर्वांच्या शाळा काढल्या, पण मोदींची शाळा कोणती? सर्वात उच्चशिक्षित आहेत....

उद्धव म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी भाषेच्या आधारावर गुंडगिरी सहन करणार नाही असा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात मराठी माणूस न्याय मागण्यासाठी आंदोलन करत असेल आणि त्याला तुम्ही गुंड म्हणत असाल तर आम्ही गुंडच आहोत. आहोत आम्ही गुंड. न्याय मागणे म्हणजे गुंडगिरी नाही.

### भाजप ही अफवांची फॅक्टरी

पण हे जे काही मध्यंतरी बोललो तसे भाजप ही अफवांची फॅक्टरी आहे. मधल्या काळात त्यांनी सुरू केले होते की, उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडले. हिंदुत्व ही काही कोणत्याही भाषेची मक्तेदारी नाही. आम्ही अस्सल मराठी बोलणारे तुमच्याहून जास्त कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत.

### मला बाळासाहेबांचे आशीर्वादच मिळत असतील

# फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार



■ **वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ५ :**

राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वादच मलाच मिळतील, अशा उपरोधिक सूरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनावर भाष्य केले आहे. मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी केवळ रुदालीचे भाषण झाले, असे ते म्हणाले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील नियोजनाचा आढावा घेत प्रशासनाने केलेल्या तयारीचे तोंड भरून कौतुक केले. आपल्या प्रशासनाने येथे अतिशय उत्तम व्यवस्था केली आहे. आता उद्याचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. निश्चितपणे यावेळी जशी उत्तम व्यवस्था झाली. आषाढीचे पर्व संपल्यानंतर काही उणिवा राहिल्या काय? हे पुन्हा पाहिले जाईल. पुढच्या वर्षी याहून चांगली व्यवस्था करू, असे ते म्हणाले.

यावेळी पत्रकारांनी त्यांचे राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाकडे लक्ष वेधले. त्यावर फडणवीस उपरोधिकपणे म्हणाले, मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे.

## चंदरकोटमध्ये ताफ्यातील बसेसची टक्कर

### ३६ जण जखमी

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ५ :**

अमरनाथ यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या ताफ्यातील चार बसेसची टक्कर झाली. रामबन जिल्ह्यातील चंदरकोट लंगरजवळ झालेल्या या अपघातात सुमारे ३६ प्रवासी जखमी झाले. ब्रेक फेल झाल्यामुळे बसच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. त्यामुळे ताफ्यातील आणखी तीन बसेस एकमेकांवर आदळल्या.

ही बातमी मिळताच, बचाव पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली आणि जखमी यात्रेकरूंना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रामबन येथे नेण्यात आले. उर्वरित प्रवाशांना इतर वाहनांमधून पहलगामला पाठवण्यात आले. तत्पूर्वी, मुसळधार पावसाला न जुमानता, शनिवारी भगवती नगर बेस कॅम्पमधून ६,९०० यात्रेकरूंचा एक नवीन जथ्था रवाना झाला. या जथ्थ्यात ५१९६ पुरुष, १४२७ महिला, २४ मुले, ३३१ साधू आणि साध्वी आणि एक ट्रान्सजेंडर यांचा समावेश आहे. यात्रा सुरू झाल्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत २६,००० हून अधिक भाविकांनी पवित्र गुहेतील बर्फाच्या शिवलिंगाचे दर्शन घेतले होते.

## हिट अ‍ॅन्ड रनमध्ये जखमी महिलेचा मृत्यू


■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**

भरधाव असलेल्या पिकअप वाहनाच्या चालकाने रस्त्यावर उभ्या महिलेला जबर धडक दिली आणि पळून गेला. या गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत सुरादेवी मार्गावर घडली.

## तेलंगणा कारखाना स्फोटातील मृतांची संख्या ४० वर

■ **वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. ५ :**

तेलंगणा फार्मा कारखान्यातील स्फोटातील मृतांची संख्या शनिवारी ३९ वरून ४० वर पोहोचली. जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी चंद्रशेखर बडुगु यांनी सांगितले की, आज सकाळी आणखी एका जखमी कामगाराचा मृत्यू झाला. आता १९ जखमींवर उपचार सुरू आहेत, तर नऊ जणांचा शोध सुरू आहे. ३० जून रोजी सकाळी ८.१५ ते ९.३० च्या दरम्यान पसुमिल्लाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये हा अपघात झाला. बचाव आणि वैद्यकीय पथकांनी त्या दिवशी ३१ मृतदेह बाहेर काढले.






## मनसैनिकांनी फोडले सुशील केडियांचे कार्यालय



**मुंबई :** मनसेच्या कार्यकर्त्यांनी सुप्रसिद्ध व्यावसायिक सुशील केडिया यांचे कार्यालय फोडले. केडिया यांनी परवा एका पोस्टद्वारे मी मराठी बोलणार नाही असे ठणकावून सांगितले होते. तसेच तुम्हाला काय करायचे ते करा असे आव्हानही त्यांनी राज ठाकरे यांना दिले होते. त्यांच्या या विधानामुळे संतप्त झालेल्या मनसैनिकांनी आज सकाळी त्यांच्या कार्यालयावर 'नारळ'फेक केली.

मुंबईत मनसेच्या कार्यकर्त्यांनी एका अमराठी दुकानदाराला केलेली मारहाण व त्यानंतर व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चामुळे स्थिती अधिकच चिघळली आहे. यामुळे संतापलेल्या सुशील केडिया यांनी राज ठाकरे यांना उपरोक्त शब्दांत आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर मनसैनिकांनी त्यांचे कार्यालय फोडले आहे.

## सुशील केडिया यांना अखेर उपरती

**मुंबई :** मराठी बोलणार नाही, काय करायचे ते करून घ्या, असे वक्तव्य करत महाराष्ट्रामध्ये वादाची ठिणगी टाकणारे मुंबईतील गुंतवणूकदार सुशील केडिया यांनी अखेर माफी मागितली आहे. सुशील केडिया यांचे कार्यालय मनसैनिकांनी आज सकाळीच फोडले होते. त्यानंतर सुशील केडिया यांनी राज ठाकरे यांची माफी मागितली आहे.

केडिया म्हणाले की, मला माफ करा, माझे वक्तव्य मी मागे घेतो. मात्र राज्यातील खराब झालेले वातावरण ज्यांना शक्य असेल त्यांनी नीट करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासाठी त्यांनी एक व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून देखील त्यांनी मराठी जनतेची आणि राज ठाकरे यांची माफी मागितली आहे.

## दोन पक्षाचा एक पक्ष करावा



**मुंबई :** ठाकरे बंधुंनी एकत्र यावे आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत. ते दोघे एकत्र येत असतील तर चांगली गोष्ट आहे आमच्या शुभेच्छा आहेत. दोघे भाऊ एकत्र यावे, एकत्र रहावे. आवश्यक असेल तर दोन पक्षाचा एक पक्ष करावा असे वक्तव्य भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

सुधीर मुनगंटीवार पुढे बोलताना म्हणाले की, मराठी माणसांनी इंग्रजी शिकणं हा अभिमान आणि पराक्रम आहे.पण हिंदी शिकणं म्हणजे मराठीचा अवमान हे मात्र अजून मला समजले नाही. मराठी या विषयावर दुरपूर्यत काही राजकारण झालेले नाही. हा गैरसमज का पसरवला जात आहे. मराठी, इंग्रजीसोबतच पहिल्या वर्गापासून हिंदी शिकवली तर शिकता येते. यात मराठीचा काय संबंध? मराठी आनिवार्य आहे, आणि राहणारच आहे याबद्दल कुठेही प्रश्नचिन्ह नाही.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, काँग्रेसने स्पष्ट केले आहे की ठाकरे बंधू जर एकत्र आले तर आपण यांच्यासोबत जायचे नाही. या वातावरणामध्ये कारण नसताना राज्यात गैरसमज कसे पसरतील हे महत्त्वाचे आहे. एकनाथ शिंदेंनी जय गुजरात म्हटले म्हणून वादंग निर्माण करण्याचे काम काय आहे. राष्ट्रगीत म्हणताना सर्वच राज्यांचा आपण जयजयकार करतोच ना? प्रतिज्ञा म्हणत असताना आपण भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहे असे म्हणतो ना? आम्ही सर्व एक आहोत. जय गुजरात आणि जय उत्तर प्रदेश म्हटले म्हणून आम्ही छोटे होतो का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

## ...तर मला हात लावून दाखवा



**मुंबई :** हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्याने आता मराठी विरुद्ध अमराठी असे रूप घेतले आहे. वातावरण तंग झाले असताना आता काली सेनेचे अध्यक्ष स्वामी आनंद स्वरुप यांनी ठाकरे बंधूंना आपल्याला हात लावून दाखवण्याचे आव्हान दिले आहे. ठाकरे बंधू मी मुंबईत येतोय. औकात असेल तर मला हात लावून दाखवा. तुमचा हात तोडला नाही तर पाहा, असे ते म्हणाले. स्वामी आनंद स्वरुप यांनी एका व्हिडिओ पोस्टद्वारे म्हटले आहे की, महाराष्ट्रात राका व साका अर्थात राज व उद्धव ठाकरे हे जे दोन भाऊ आहेत. त्यांच्या छोट्या छोट्या गँग आहेत. ते आता सत्तेपासून खूप दूर आहेत.

### शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची मदत १ लाखापेक्षा वाढवण्यास

# मंत्र्यांचा स्पष्ट शब्दात नकार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** महसूल व वन विभाग नापिकी, राष्ट्रीयीकृत बँक व सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास त्याच्या वारसांना नियमानुसार १ लाख रुपये इतकी मदत देण्यात येते.

मात्र, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तींच्या वारसांना मिळणाऱ्या मदतीच्या धर्तीवर शेतकरी आत्महत्या प्रकरणांतील कुटुंबीयांना वाढीव मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाचे मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी विधानसभेत एका तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली आहे.

महाराष्ट्रात वाघाच्या हल्ल्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास राज्य सरकार २५ लाख रुपयांची मदत देते. म्हणूनच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत वाढवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. परंतु विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात मंत्र्यांनी लेखी उत्तर दिले आहे की असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. आमदार रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आदींनी हा प्रश्न विचारला होता.



**कर्जमाफीसाठी प्रहारचे आंदोलन**

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने शुक्रवारी विधानभवन परिसरात जोरदार आंदोलन केले. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा मुद्दा गंभीर बनला असून, सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी यावेळी प्रहारच्या कार्यकर्त्यांनी केली.

कार्यकर्त्यांनी विधानभवन परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेच्या गेटवर चढून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करा, शेतकरी विरोधी सरकार हाय हाय अशा घोषणा देत आंदोलकांनी विधानभवन परिसर दणाणून सोडला. या आंदोलनामुळे विधानभवन परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र आंदोलकांना ताब्यात घेत पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

**वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास मिळतात २५ लाख**

पूर्वी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास ५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जात होती, पुढे ही रक्कम १० लाख रुपये आणि ही रक्कम नंतर वाढवून १५ लाख रुपये करण्यात आली. आता ही रक्कम २५ लाख रुपये आहे.

मात्र, कर्जाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास त्याच्या कुटुंबियांना केवळ १ लाख रूपये देवून बोळवण केली जाते. अशा कुटुंबांना दिली जाणारी मदतीची रक्कम वाढविण्याची सर्व स्तरातून मागणी होत असताना, संबंधित मंत्र्यांनी नकार दिला आहे. ही शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांची प्रतारणा असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

## मराठी माणसाचा अपमान करणाऱ्यांनी माफी मागावी

### खासदार संजय राऊत यांची मागणी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** मराठी माणसाचा अपमान करणाऱ्यांनी माफी मागावी, अशी ठाम मागणी उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, मराठी माणसाला सन्मानाने जगता यावे म्हणून शिवसैनिकांनी संघर्ष केला, तुरुंगवास पत्करला, गुन्ह्यांचे कलंक झेलले. अशा आंदोलनांनी आम्ही राज्यात मराठी अस्मितेचा झेंडा उंच ठेवला. त्यामुळेच काही जण मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर आहेत. त्यामुळे आज आम्हालाच गुंडगिरीचा शिक्का लावण्याचा प्रयत्न केला जातोय असे म्हणत राऊतांनी टोला लगावला आहे.

राऊत म्हणाले की, गुजरातच्या बांधवांनी महाराष्ट्रात विकासकामं केली. मग संपत्ती, पैसे नाही का कमावले? उपकार करतात का? पारशी समाजाने सर्वात जास्त योगदान केले आहे. असे बोलून मराठी माणसाचा अपमान करत आहात. मुंबई ही मराठी गिरणी कामगारांच्या घामातून उभी राहिलेली आहे, ती कोणत्याही धनाढ्य शेठजींच्या पैशातून उभी राहिलेली नाही.

फडणवीस आणि शिंदेंनी मराठी माणसाचा अपमान केल्याबद्दल माफी मागायला हवी. एकनाथ शिंदे तर मंत्रिमंडळातील सर्वात कच्चे मडकं आहेत. ते सध्या राजकीय गोंधळात सापडले आहेत. त्यामुळे असंबद्ध विधानं करत आहेत, अशी सडकून टीका राऊतांनी केली.

गुजरात, महाराष्ट्र एकेकाळी एकच राज्य होते हे शिंदेंना माहीत नाही. बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर ही मराठी संस्थाने होती. पण तरीही नरेंद्र मोदी किंवा अमित शहा तिथे जाऊन जय महाराष्ट्र म्हणत नाहीत. योगी आदित्यनाथदेखील ह्यजय उत्तर प्रदेशच म्हणतात. मग तुम्हीच मराठी अस्मिता पायदळी तुडवणार का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

हिंदी सक्तीविरोधात शिवसेनेने उभारलेल्या संघषार्नंतर राज्य सरकारने माघार घेतली असून, सरकारच्या निर्णयामुळे आणि जनतेच्या पाठिंब्यामुळे मराठी अस्मितेचा विजय झाल्याचेही ते यावेळी म्हणाले.

### डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज अतिरिक्त फी वसूली प्रकरण

## पीएमओकडून दखल

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :** पुण्यातील डी वाय पाटील मेडिकल कॉलेजमधील एमबीबीएस फी प्रकरण आता पंतप्रधान कार्यालयापर्यंत (पीएमओ) पोहोचले आहे. संस्थेतील पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्याने माहिती अधिकार अर्ज दाखल केल्यानंतर ग्राहक व्यवहार मंत्रालयाने हे प्रकरण पंतप्रधान कार्यालयापर्यंत नेले.

विद्यार्थ्यांनी आरोप केला होता की डी वाय पाटील मेडिकल कॉलेज हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर ४.५ वर्षांऐवजी ५ वर्षांसाठी एमबीबीएस फी वसूल करत आहे. तसेच कॉलेज गेल्या तीन वर्षांपासून ही अतिरिक्त फी वसूल करत आहे आणि दरवर्षी २५० एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या प्रवेशामुळे सुमारे ७५० विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे. मेडिकल कॉलेजमधील वार्षिक एमबीबीएस फी सुमारे ३२ लाख रुपये असल्याने विद्यार्थ्यांकडून वसूल केलेली अतिरिक्त रक्कम शेकडो कोटी रुपयांच्या घरात आहे.

विद्यार्थ्यांकडून याबाबत असंख्य तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने व होत असल्याकारणाने संबंधित शुल्क नियमावलीनुसार याबाबत चौकशी करण्याचे आदेश राज्य वैद्यकीय शिक्षण संचालक यांना देण्यात आले आहे. डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देखील याबाबतचे पत्र पाठविण्यात आले असून खुलासा मागिविण्यात आलेला आहे. याबाबत सदर महाविद्यालयाच्या प्रशासनाशी संपर्क साधला असता त्यांनी काही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

या आरोपांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसली तरी, एनएमसीने आरोग्य सेवा संचालकांना या संदर्भात पत्र लिहिले आहे.

## संत विचार, संविधानास हरकत नाही : वारकरी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** पंढरपूरच्या आषाढी वारीत शहरी माओ नक्षलवादी विचारांचा प्रचार -प्रसार होत असून संविधान दिंडी- पर्यावरण वारी यांसारखे लेबल लावून अनेक नक्षलवाद्यांशी संबंधित लोक दिंडीत हस्तक्षेप करत असल्याचा आरोप शिंदे सेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी केला होता. यावर वारकरी संप्रदायात संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या.

भारतीय संविधानाला अभिप्रेत राष्ट्र उभारणी थांबवण्यासाठी, आपली राजकीय सांस्कृतिक पोळी भाजून घेण्यासाठी हे लोक समाजाची दिशाभूल करून द्वेष निर्माण करत आहेत, असे संविधान समता दिंडीचे श्यामसुंदर महाराज यांनी म्हटले आहे.

वारीत येऊन पर्यावरणाचे वाद सांगावेत, हरित वारी सांगावी. समाज प्रबोधन करावे. बुद्धिभेद सांगू नये. बुद्धिभेद सांगणाऱ्यांची बुद्धी तपासावी, असे वारकरी फुलचंद नागटिळक म्हणाले.

आतापर्यंत कोणी नक्षलवादी असल्याचा अहवाल आमच्याकडे नाही. संविधान समता दिंडीचा उल्लेख झाल्याची चर्चा आहे, त्या दिंडीच्या उद्घाटनास मी स्वतः गेलो आहे, असे पालखी सोहळ्याचे चोपदार राजाभाऊ चोपदार म्हणाले.

देव न मानणाऱ्यांनी वारीचा अनुभव घ्यावा. वारीत विज्ञान दडलेले आहे. वारीत सर्वजण सुरक्षित आहेत, अशी प्रतिक्रिया संत तुकाराम महाराजांचे वंशज राजू मोरे महाराज यांनी दिली.

## एक प्रबोधक, दुसरा प्रक्षोभक..

### ठाकरे बंधूंच्या मनोमिलनावर शिंदेसेनेची सडकून टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने राज व उद्धव ठाकरे यांच्या १८ वर्षांनंतर झालेल्या मनोमिलनावर हल्ला चढवला आहे. दोन भावांतील एक जण प्रबोधक असून, दुसरा प्रक्षोभक आहे. एक मराठी प्रेमी तर दुसरा खुर्चीप्रेमी. एक मराठीचा पुरस्कर्ता, तर दुसरा तिरस्कर्ता आहे, असे शिवसेनेने म्हटले आहे.

राज ठाकरे व उद्धव ठाकरे मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी व हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाविरोधात मिळालेल्या यशाचा जल्लोष साजरा करण्यासाठी तब्बल १८ वर्षांनंतर आज एकत्र आले.

मनसे व शिवसेना ठाकरे गटाच्या या मनोमिलनाद्वारे मराठी भाषा व संस्कृतीच्या हितासाठी एकजुटीचे दर्शन घडले. महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक इतिहासातील हा एक महत्त्वाचा क्षण असल्याचे मानले जात आहे.

या मेळाव्याद्वारे राज व उद्धव यांनी आपली भावी राजकीय वाटचाल एकत्र करण्याचे संकेत दिलेत. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने एका कवितेद्वारे त्यांच्यावर निशाणा साधला आहे.

एक प्रबोधक, दुसरा प्रक्षोभक
एक उजवा, दुसरा डावा
एक धाकला असून थोरला
दुसरा थोरला असून धाकला
एक मराठी प्रेमी, दुसरा खुर्चीप्रेमी
एकाच्या मुखी आसूड, दुसऱ्याच्या तोंडी सूड!
एक मराठीचा पुरस्कर्ता, दुसरा तिरस्कर्ता
एक प्रगल्भ, दुसरा वेडापिसा
एकाचा मराठीचा वसा
दुसरा भरतोय खिसा
एकाचा स्वतंत्र सवतासुभा
दुसरा नुसताच आयतोबा!

अशा शब्दात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने टीका केली आहे. यावरून पुढे आता नवा वाद उफाळू शकतो.

## अत्याचार प्रकरणात तरुणीचा खोडसाळपणा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :** कोंढव्यात कुरियर बॉयने एका युवतीवर अत्याचार केल्याचे प्रकरण संबंधित तरुणीचा खोडसाळपणा असल्याचे उघड झाले आहे. शुक्रवारी पोलिसांनी तरुणीच्या मित्राला ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील सत्य बाहेर आले आहे. दिशाभूल करणाऱ्या तरुणीवर कारवाई करण्याच्या विचारात पोलिस आहेत.

गृह मंत्रालयाने आणि राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तपासाचे आदेश दिले. या दरम्यान तरुणी चौकशीला सहकार्य करत नव्हती. पोलिसांनी मोबाईल लोकेशन्स, सीसी टीव्ही फुटेज तसेच घटनेच्या वेळी कोणते मोबाईल फोन चालू होते, त्याबाबतचे तांत्रिक विश्लेषण केले. या तपासात बाणेरमधील एका आयटी अभियंत्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केल्यावर या युवतीने कुभांड उघडकीस आले.

हा अभियंता व ती तरुणी एकाच समाजाचे असून वधू वर परिचय संमेलनात उभयतांची वर्षभरापूर्वी ओळख झाली. त्यानंतर, ते नियमित संपर्कात आले. हा अभियंता तिच्या घरी नेहमी येत असे. दोघे एकत्र फिरायलाही जात असत.

घटना घडली त्या दिवशी सायंकाळी त्यांच्यात झालेल्या बोलण्यानुसारच हा अभियंता तरुण तिच्या घरी गेला होता. तेथून तो रात्री साडेआठच्या सुमारास बाहेर पडला. त्यानंतर, दोन तासांनी या युवतीने पोलिसांकडे अत्याचार झाल्याची फिर्याद दिली.दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असून पीडितेचे मानसोपचार तज्ज्ञाकडून समुपदेशन केले जात असल्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

## पत्नी, सासूला करायला लावला नग्न विधी

**सासरे व मेहुण्याला पाठवले फोटो**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** मुंबईतील एका व्यक्तीने आपल्या मेहुण्याला लग्नात मदत करण्याच्या उद्देशाने आपल्या पत्नी आणि सासूला काळ्या जादूशी संबंधित काही विधी विवस्त्र होऊन करण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने त्यांच्या परवानगीशिवाय त्यांचे नग्न फोटो काढले. त्यानंतर त्याने या फोटोंसह तिला अजमेरला बोलावले.

पीडिता जेव्हा अजमेरला फोटो घेऊन गेली तेव्हा आरोपीने ते फोटो महिलेच्या वडिलांना आणि भावाला व्हाट्सॲपवर पाठवले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा उत्तर प्रदेशातील देवरियाचा रहिवासी आहे.

ही संपूर्ण घटना एप्रिल ते जुलै दरम्यान नवी मुंबईतील आरोपीच्या घरी घडली. पीडितेने ३ जुलै रोजी वाशी पोलिस ठाण्यात धाव घेतली. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सुरू करण्यात आला. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

नग्न पूजा करून, शारीरिक छळ करून, राख देऊन किंवा ताबीज देऊन समस्या सोडवण्याचा दावा करणे हा गुन्हा आहे. महिलांचे लैंगिक शोषण करणे किंवा त्यांच्यावर मानसिक दबाव आणून तांत्रिक विधी करणे हे दंडनीय आहे.

भूत, ग्रह, तारे, देव किंवा शापांच्या नावाखाली पीडितेला घाबरवण्यासाठी आणि धर्माच्या नावाखाली फसवणूक किंवा अमानुष वर्तन करण्यासाठी देखील शिक्षा होऊ शकते.

### वरळीचा कार्यक्रम कौटुंबिक स्नेहमिलन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५:** राज व उद्धव ठाकरे यांनी आजच्या विजयी मेळाव्यात आगामी निवडणुकांसाठी एकत्र येण्याचे संकेत दिलेत. त्यांच्या या युतीवर सत्ताधारी भाजपने सडकून टीका केली आहे. वरळीचा कार्यक्रम हा कौटुंबिक स्नेहमिलनाचा होता. ही भाषेसाठी नव्हे तर निवडणुकीसाठी केलेली जाहीर मनधरणी होती, असे भाजप नेते आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

आशिष शेलार आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, ही भाषेसाठी नाही तर निवडणुकीसाठी केलेली जाहीर मनधरणी आहे. महापालिका निवडणुका जवळ आल्यामुळे भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता ₹भाऊबंदकी₹ आठवली. ज्या भावाला घराबाहेर काढले त्याची जाहीर मनधरणी करण्यासाठी आजचा वरळीचा कौटुंबिक स्नेह मिलनाचा कार्यक्रम होता. त्यात भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच... आणि ते यांच्या लेखी नाहीच! महापालिकेतील सत्ता मिळवण्यासाठी आणि पुन्हा मुंबईची लुटमार... त्यासाठी सत्ता.. यासाठी केलेली ही केविलवाणी धडपड आहे. निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## ५०० किलो मोरपिसांसह ११ जणांना अटक




■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :** पुण्यातील सोमवार पेठ मध्ये नरपतगीरी चौक, येथे मोर या राष्ट्रीय पक्षाचे पिसे अवैधरित्या साठवणूक करून विक्री करत असत असल्याचे गुप्त माहिती मिळाल्यावरुन घटनास्थळी जाऊन एकुण ११ आरोपींना वन विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले तसेच ५०० किलो मोराची पिसे जप्त केली आहे.

त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी मोराची पिसे ही विक्री करण्यासाठी आणले असून त्याबद्दल त्यांचेकडे कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता सदर विक्री ते करीत आहेत असे सांगितले. त्यानंतर त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी संत गाडगेबाबा धर्मशाळा, येथील वसाहतीमध्ये आमचे इतर सहकारी मोराची पिसे विक्री करण्याकरिता साठवणूक करीत असल्याची माहिती दिली.

माहितीच्या आधारे वनविभागातील अधिकारी,कर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, अंदाजे ४००ते ५०० किलो मोराची पिसे साठवणूक केलेली दिसून आले. त्यानंतर तेथील मुद्देमाल तसेच एकूण ११ आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी हे मूळचे उत्तर प्रदेश येथील रहिवासी आहेत. त्यांचेविरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आलेला असून, पुढील तपास सहाय्यक वनसंरक्षक मंगेश ताटे यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे.

ही कारवाई वनसंरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक महादेव मोहिते तसेच सहाय्यक वनसंरक्षक मंगेश ताटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) ऋषिकेश चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी भांबुर्डा मनोज बारबोले आणि वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक व अधिनस्त कर्मचारी यांनी केली

**पिसांचा उपयोग अंधश्रद्धेपोटी**

मोर हे आपल्या देशाचे राष्ट्रीय पक्षी असून, त्यांचे पिसे काढणे, साठवणे, विक्री करणे किंवा खरेदी करणे गैरकायदेशीर आहे.सदरील पिसांचा उपयोग अंधश्रद्धेपोटी व घराच्या सजावटीसाठी केला जातो, मात्र यामुळे मोरांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो.

त्यामुळे वनविभागाचे वतीने आवाहन करण्यात आले की,सर्व नागरिकांनी मोरपिसांची खरेदी व विक्री टाळावी, तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही बेकायदेशीर विक्रीची माहिती तात्काळ वनविभागास कळवावी, जेणेकरून आपला राष्ट्रीय पक्षी मोर वाचवता येईल.

# गहाण कापूस गाठी आढळल्या पानेवाडीत

### भाडेतत्त्वावर वखार महामंडळ गोदामात ठेवलेल्या २६५० गाठी सुरक्षित असल्याची खोटी माहिती?

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक दि. ५ :** श्रीरामपूर येथील अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेची तब्बल ७ कोटी ४४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना ४ ते २० फेब्रुवारी या कालावधीत घडली होती.

या प्रकरणी करणाऱ्या सहा जणांविरोधात मनमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील कापसाच्या गाठी मनमाडनजीक पानेवाडी व धोटाने शिवारात आढळून आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मनमाड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करत कापसाच्या गाठी उघड्या शेतातून हस्तगत केल्या आहेत. या प्रकरणातील मुख्य चार आरोपी अद्याप फरार आहेत.

अंबिका महिला पतसंस्थेकडे गहाण असलेल्या २६२५ कापूस गाठींची परस्पर बेकायदेशीर विक्री करून आर्थिक फसवणूक केली. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ मनमाड येथे भाडेतत्तवावर ठेवलेल्या २६५० कापूस गाठी गोदामात सुरक्षित असल्याची खोटी माहिती पतसंस्थेला दिली.

पतसंस्थेचे व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी मनमाड येथील गोदामात येऊन कापूस गाठीची पाहणी केली असता प्रथम त्यांना विरोध दर्शवला. नंतर बालाजी ऑईल मिल यांचा कापूस गाठी ठेवलेला उतारा पाहिला असता तारणाखाली



असलेल्या २६५० गाठींपैकी २६२५ गाठींची परस्पर विक्री केल्याचे दिसून आल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

अण्णासाहेब जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्री बालाजी ऑईल मिल या संस्थेचे भागीदार रायभान बावके, महेश मगर, प्रशांत कासार, सागर बावके आणि वखार महामंडळाचे साठा अधिक्षक प्रल्हाद चौधरी व नाशिक येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापक यांच्याविरुद्ध फसवणुकीसह गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

संबंधित फर्मने ७००० कापसाच्या गाठी वखार महामंडळाच्या गोदामात तारण म्हणून ठेवून त्यावर १६.४० कोटी रुपयांचे कर्ज घेतले. त्यातील २६६ प्रकरणांची परतफेड केली होती. उर्वरित प्रकरणातील १०६ गाठी अजूनही तारणाखाली होत्या व त्यावर ७.१४ कोटी रुपयांचे कर्ज थकीत होते.

महासागर

•रविवार,दि.६ जुलै २०२५

अकोला

पान 3

## पंकज कांबळे उरळचे नवे ठाणेदार

**गायगाव :** बाळपूर पोलिस स्टेशन मध्ये सध्या कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज कांबळे यांची उरळ ठाणेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक अर्जित चांडक यांनी ३ जुलै रोजी काढलेल्या बदली आदेशानुसार पंकज कांबळे यांचेकडे उरळ ठाणेदार पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## पंढरपूरला जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांचे खा.अनुप धोत्रे यानी रेल्वे स्टेशनवर घेतले आशीर्वाद

### जिल्हाभाजपा व आ. रणधिर सावरकर आ.वसंत खंडेलवाल यांनी दाखवली गाडीला हिरवी झेंडी





**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** भागवत धर्माची पताका अविरतपणे चालू ठेवणारे वारर्कयानी पिढ्यान पिढ्या संस्कार भक्ती मानवता अंगीकार करून समाजदर्शक काम केलं वारकरी हे सेवेकरी असून त्यांच्या आशीर्वाद घेणे एकादशीच्या पूर्वसंध्येला त्यांच्यासाठी विशेष गाडी खासदार अनुप धोत्रे यांनी गेल्या दोन वर्षापासून सुरू केली या वारकऱ्यांचे पूजन आशीर्वाद घेण्याची परंपरा भारतीय जनता पक्षाने अविरतपणे सुरू ठेवली केवळ गप्पांचा बाजार न करता नौटंकी न करता धर्माविषयी आस्था सनातन धर्माविषयी प्रेम इतर धर्माचा आदर परंतु द्वेष नाही परंतु काही तत्व आता कुकुरमुक्ते सारखे पावसाळी झाडे सनातन धर्मावर खोटे प्रेम करण्याचा नाटक करत असून त्याच्यापासून सावध राहण्याची गरज असल्याची प्रतिपादन आ. रणधीर सावरकर यांनी केले.

प्लॅटफफॉर्म क्रमांक पाच इथून अकोला मिरज पंढरपूर या गाडीमध्ये ४ ८७ वारकऱ्यांचा सन्मान करून त्यांना फराळ जलपान, त्यांचे पूजन करून त्यांचं स्वागत करण्याचा कार्यक्रमाचे बोलत होते.

वारकरी यांना सुविधा व्हावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव, राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाकडे महाराष्ट्रातून साडेतीनशे गाड्या विशेष गाड्या सुरू केल्या असून अकोल्या वरून चार गाड्या वारकऱ्यांना तर जवळपास ३०० च्या वर बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

ही जगातील सर्वात मोठी वारकरी ची मेळा संगम शिस्तबद्ध मानवतावादी जात पात पंथ पेक्षा भक्ती आणि श्रद्धेला महत्त्व देणारा व हिंदू संस्कृती जतन करणारा असल्यामुळे ही ट्रेन सुरू व्हावी आपण प्रयत्न केला आणि गेल्या दोन वर्षापासून ही सातत्याने सुरू आहे त्या वारकऱ्यांचा सन्मान करणे त्यांचा आशीर्वाद घेणे हे कर्तव्य असल्याचे खा. अनुप धोत्रे यांनी सांगितले यावेळी आ. वसंत खंडेलवाल यांनी सुद्धा वारकरी परंपरा भाजपा लोकप्रतिनिधी सातत्याने समाजाला दिशा देण्याचे काम करत असतात समाज हित राष्ट्रहित हे प्रथम लक्ष ठेवून कार्यरत असतात अशी ही ते म्हणाले.

यावेळी विजय अग्रवाल यांनी वारकरी हा समाजाला दिशादर्शक करणारा आनंद आणि भक्ती विश्वासाचा प्रतीक असल्याचे सांगितले यावेळी दहा वारकऱ्यांचा श्रीफळ शाल देऊन स्वागत आणि गौरव करण्यात आला ट्रेनचे ड्रायव्हर प्रदीप देवांगन यांचे सुद्धा शाल श्रीफळाने मान्यवरांनी स्वागत केले.

### साथ प्रतिबंधासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत बैठक

## गावोगाव शुद्ध पाण्याचा पुरवठा आवश्यक; जलस्त्रोतांच्या तत्काळ तपासण्या व उपाययोजना करा : जिल्हाधिकारी अजित कुंभार

**※नियमित क्लोरिनेशन आवश्यक ※स्त्रोत सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांकडून घ्यावे**



**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** पावसाळा लक्षात घेता कुठेही साथ पसरू नये म्हणून शुद्ध पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. प्रत्येक गावातील जलस्त्रोतांची तपासणी करून तत्काळ उपाययोजना करावी व स्त्रोत प्रदुषित होत नसल्याबाबत प्रमाणपत्र ग्रामसेवकाकडून घ्यावे. ही कार्यवाही पुढील ३ दिवसांत पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

अकोट तालुक्यातील धामणा येथे पटकी उद्रेक जाहिर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी संबंधित यंत्रणांची ऑनलाईन बैठक घेऊन आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्यासह उपविभागीय अधिकारी. तहसीलदार,गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, न. प. मुख्याधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, जलवाहिनी व जलस्त्रोतांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश मान्सूनपूर्व बैठकीत सर्व यंत्रणांना देण्यात आले होते. जिल्ह्यात कुठेही साथ पसरता नये. त्यासाठी शुद्ध पाण्याचा पुरवठा होणे आवश्यक आहे. गावातील कुठलाही जलस्त्रोत प्रदुषित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र ग्रामसेवक, जलसुरक्षा रक्षक यांच्याकडून पुढील ३ दिवसांत घ्यावे. पाण्याचे क्लोरिनेशन होते का, त्यासाठी साठा, साठवणूकीची पद्धत यांची माहिती, तजवीज आहे का, हे ही त्या प्रमाणपत्रात नमूद असावे. तहसीलदारांनी तत्काळ किमान ५ हून अधिक, गटविकास अधिका-यांनी किमान १० हून अधिक व विस्तार अधिका-यांनी किमान २० हून गावांना भेटी देऊन स्त्रोत पाहणी करावी. गावांची निवड करताना यापूर्वी तिथे साथ आली होती का किंवा कसे, याचा विचार करावा. धामणानजिकच्या रेलगाव येथेही आवश्यक तपासणी करावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.गावात पिण्यायोग्य पाणी असणाऱ्या कुपनलिका, जलस्त्रोत याची संपूर्ण माहिती संबंधित यंत्रणेला माहिती असणे आवश्यक आहे. प्रतिबंधात्मक योजना वेळीच केल्या तर अडचण येत नाही. शुद्ध पाण्याचा पुरवठा ही महत्वाची जबाबदारी असून, या कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. पावसाळ्यात नागरिकांत पाणी उकळून पिण्याबाबत जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

## थोडक्यात

### घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला शासनाची मान्यता

**अकोला :** स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत अकोला महापालिकेच्या २१.१७ कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाला राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मंजुरी दिली असून, ओल्या व सुक्या कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, कचरामुक्ती आणि शाश्वत स्वच्छतेची अंमलबजावणी शक्य होणार आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान १.० अंतर्गत भोड येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला असून, येथे ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या शिवाय दोन ट्रान्सफर स्टेशन उभारणी तसेच कॉम्पॅक्टर खरेदी करण्यात आली आहे.

### पंढरीच्या वारकऱ्यांना पथकरातून सवलत

**अकोला :** श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी जाणाऱ्या पालख्या, वारकरी यांना पथकरातून सवलत देण्यात आली आहे. सदर सवलत १० जुलैपर्यंत पालखी, वारकऱ्यांच्या हलक्या व जड वाहनांसाठी असेल. त्यासाठी पास देण्यात येत आहेत. ते परतीच्या प्रवासातही ग्राह्य असतील. असा पास मिळवू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी प्रादेशिक परिवहन कार्यालयात अर्ज करावा. वाहन क्रमांक, मालकाचे नाव, भ्रमणध्वनी, प्रवासाच्या तारखा आदी माहिती, तसेच आधारपत्राची स्वसाक्षांकित प्रत जोडावी. अकोला जिल्ह्यातून आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविक, पालख्या व वारकरी यांनी पथकर सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

### संभाजी ब्रिगेड कार्यकारिणी आज पुनर्गठन बैठक

अकोला : संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्रात संभाजी ब्रिगेडचे जिल्हा, महानगर, तालुका, व राज्य कार्यकारणी पुनर्गठण आणि पुनर्बांधणी सुरू असून त्याकरिता निवड समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवड समितीमध्ये संभाजी ब्रिगेडचे प्रदेश सभ कार्याध्यक्ष सुधीर मामा देशमुख, प्रदेश प्रवक्ते प्रेम कुमार बोके आणि संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर आदी अकोला जिल्हा कार्यकारणी पुनर्बांधणी बैठकीकरिता उपस्थित राहणार आहेत. तरी जिल्ह्यातील इच्छुक युवक युवती आणि उमेदवारांनी शनिवार, ५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता जिजाऊ सांस्कृतिक भवन, मराठा सेवा संघ कार्यालय, जुना आरटीओ ऑफिस जवळ, उपस्थित रहावे असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे अकोला जिल्हाध्यक्ष ॲड. नमन पाटील आंबेकर यांनी केले.

## हिंदु विधिज्ञ परिषदेची राज्य शासनाकडे तक्रार;'वक्फचे लाड बंद करा'

### अकोल्यातूनही मागणीला पाठिंबा



**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** हिंदु विधिज्ञ परिषदेकडून राज्य सरकारकडे वक्फ आणि मंदिरांसंदर्भातील भेदभावासंबंधी तक्रारवजा मागणी करण्यात आली आहे. 'वक्फ बोर्डाला मिळणाऱ्या विशेष शासकीय सवलती आणि कायदेशीर संरक्षणाच्या तुलनेत हिंदू मंदिरे आणि तीर्थक्षेत्रांना न्यायासाठी दरवेळी न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतात,' असा आक्षेप परिषदेकडून नोंदवण्यात आला आहे.या संदर्भात परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी राज्य सरकारला पत्र लिहून मागणी केली आहे की, काँग्रेस सरकारने 'महाराष्ट्र गव्हर्नमेंट प्रेमिसेस एव्हिक्शन ॲक्ट, १९५६' मध्ये वर्ष २००८ मध्ये दुरुस्ती करून वक्फ बोर्डाला अंतर्भूत केले, परंतु हिंदू मंदिरे, जैन मंदिरे, गुरुद्वारे यांना त्यातून वगळण्यात आले आहे – हा थेट धार्मिक भेदभाव असून, तो असंवैधानिक आहे. त्यामुळे, सरकारने एकतर वक्फ बोर्डाचे नाव यातून वगळावे किंवा सर्व धार्मिक संस्थांना समान संधी देत कायद्यात सामील करावे, अशी ठाम मागणी केली आहे.अकोला येथे नुकत्याच पार पडलेल्या हिंदु राष्ट्र समन्वय समिती, मंदिर महासंघ आणि राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती यांच्या बैठकीत या मागणीस एकमुखी पाठिंबा देण्यात आला. बैठकीत स्थानिक अधिवक्त्यांनी सांगितले की, त्यांच्या घरासमोरील सरकारी जागेवर वक्फ बोर्डाकडून फलक लावून खोडसाळपणा केला जात आहे आणि ते त्याविरोधात न्यायालयीन लढा देत आहेत.

## शाळा, महाविद्यालय मार्गावर रोडरोमियो सैराट

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** उन्हाळ्यातील दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर १ जुलैपासून शाळा सुरू झाल्या आणि शहरातील शाळा व महाविद्यालयीन मार्गांवर रोड रोमीओंचा उच्छाद वाढला. शाळा महाविद्यालयीन मार्गावर भरधाव वेगाने दुचाकी चालवून कट मारण्याचे प्रकार वाढल्याने काही किरकोळ अपघात देखील घडले. त्यामुळे शहर पोलीस स्टेशनमध्ये कार्यान्वित असलेल्या निर्भया पथकाने उच्छाद मांडलेल्या या रोड रोमीओना शिस्त लावण्याची लावण्याची गरज निर्माण झाली आहे. शाळा महाविद्यालयीन मार्गावर दुचाकी चालवत असताना मुली दिसल्यास त्यांना पाहून टॉटिंग करणे, कट मारणे व वारंवार त्यांच मार्गावर दुचाकी घेऊन चकरा मारणे असे प्रकार वाढले असून या प्रकारांमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय शाळा महाविद्यालयीन मुलींनाही याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शहर पोलीस स्टेशन मधील निर्भया पथकाने शाळा महाविद्यालयीन मार्गावर गस्त वाढवून सैराट झालेल्या रोड रोमीओना शिस्त लावावी अशी मागणी केल्या जात आहे.

## अकोला पाटबंधारे विभाग अकोला

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** दि ०५/०७/२०२५ Time -७:०० अच वा.(१) काटेपूर्णा प्रकल्प पातळी ३४१.१२ मी साठा १८.७२६ mmg३ टक्केवारी २१.६८ %आजचा पाऊस १०mmएकूण पाऊस ८७ mm गेट ०० oen ०० सेमी. discharge ००.०० cumecs २) वान प्रकल्प ता,तेल्हारा पातळी ३९५.८७ मी साठा. २७.८६mm ३ टक्केवारी ३३.९९ %आजचा पाऊस ०० mm एकूण पाऊस १५८ mm गेट ०० oen ०० सेमी Discharge ००.०० cumecs. ३) मोर्णा प्रकल्प ता पातूर पातळी ३६२.६० मी साठा १८.९८ mm ३ टक्केवारी ४५.७७ % आजचा पाऊस ०५ mm एकूण पाऊस १९३mm सांडवा. ०० सेमी,विसर्ग ०.० cumecs.४) निर्गुणा प्रकल्प ता पातूरपातळी ३९१.३० मी साठा २८.४१ mm३ टक्केवारी ९८.४७ % आजचा पाऊस ०० mm एकूण पाऊस ०० mmसांडवा ०० सेमी विसर्ग ०.०० cumecs ५) उमा प्रकल्प ता, मूर्ती पातळी ३३८.०० मी साठा ०.७४१ mm ३ टक्केवारी. ६.३४% आजचा पाऊस १० mm एकूण पाऊस ६०mm सांडवा ०० सेमी विसर्ग ०० cumecs,६) दगडपारवा प्रकल्प पातळी ३१४.६५ मी.साठा २.४६ mm ३ टक्केवारी २४.१४% आजचा पाऊस ०० mm एकूण पाऊस ८७ mm गेट ००`शिप ०० सेमी.डिस्चार्ज ०.०० cumecs.

## आदिनाथ जैन मंदिरात चातुर्मास साठी संत आगमन



**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** स्थानीय जुन्या भाजी बाजार परिसरातील श्री आदिनाथ जैन मंदिरात चातुर्मास निमित्ताने महाराज साहेबांचे आगमन झाले.शनिवारी चातुर्मास निमित्त आचार्य प पु चंद्रशेखर विजयजी म सा चे शिष्य पु विमल हंस विजयजी म सा यांचे शिष्य प पु परमहंस विजयजी म सा,प पु मुनिराज श्रमणहंस विजय जी म सा तथा साध्वी सुयशप्रज्ञाश्री जी म सा आदीठाणा चार यांचे महानगरात आगमन झाले.सकाळी स्थानीय कमल हौसिंग सोसायटी मधील लाभार्थी प्रेमचंद शाह परिवार यांच्या परिसरातून उपस्थित महाराजांचे पूजन करण्यात येऊन तेथून महाराजांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.ही शोभायात्रा स्थानीय संभवनाथ जैन मंदिर मार्गे बँड बाजाच्या गजरात शेकडो महिला पुरुष भक्तांच्या समवेत जुन्या भाजी बाजार परिसरातील आदीनाथ जैन मंदिरात येथून येथे या शोभायात्राचे समापन करण्यात आले. या नंतर महाराज साहेब यांचे मांगलिक प्रवचन संपन्न झाले.यावेळी मंदिर परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती.यावेळी श्री आदिनाथ जैन मंदिर के अध्यक्ष राजूभाई भंडारी, संदीप फ़ोफरिया, हर्षदभाई शाह, हिमांशु पारेख, देवेंद्र शाह, दिलीप देवकरण शाह,राजेशभाई शाह,सतीश कोठारी, चेतन कोरडिया,समवेत सकल श्वेतांबर जैन समाजाचे बांधव उपस्थित होते.

## प्रभातच्या वारकऱ्यांची वारी सुखी होण्या शेतकरी



### ४०० वारकऱ्यांच्या रिंगण सोहळ्याने आणली रंगत

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** आषाढी एकादशीनिमित्त प्रभात किड्स स्कूलमध्ये मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशी सोहळा मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची भक्ती, शक्ती आणि संस्कृती याची जाणीव व्हावी या उद्देशाने यावर्षी देखील प्रभातच्या मराठी विभागाद्वारे 'प्रभातच्या वारकऱ्यांची वारी 'सुखी होण्या शेतकरी' या थिमला अनुसरून आषाढी एकादशी सोहळा दिनांक ५ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात शेती व शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित 'जगाचा पोशिंदा बळीराजा' हे सादरीकरण देऊन विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रम शेतकऱ्यांना समर्पित केला. कार्तिकी सोनोने या इयत्ता दुसरीच्या चिमुकलीने 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' ही नाट्यछटा सादर करून प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'बघा उघडोनी दार' हे भक्तीगीत प्रस्तुत केले तर नृत्य विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. टाळ मृदुंगाच्या गजरात पावली खेळत, फुगडीवर फेर धरत पालखी मंचावर आली. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, ॲड. वल्लभ नारे यांच्या हस्ते पूजा व आरती झाली. त्यावेळी प्रभातचे सभागृह भक्तीमय झाले होते. यावेळी कार्यक्रमाला प्रभातचे सचिव नीरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उप-प्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक आसिफ जारीयावाला, सीबीएससी समन्वयक प्रशांत होळकर, स्पर्धा परीक्षा प्रमुख व्ही. अनुराधा आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागप्रमुख चंद्रकांत पोरे, विभाग उप-प्रमुख अनुराधा माहोरे, स्वाती ठाकरे, आनंद जोशी, सीमा साठे, रोहित हिवरकर, अविनाश तराळे, गुरुदास होले, वर्षा दांडगे, कविता कोल्हाळे, कविता विखे, दिपाली पोरे, मुक्ता धुमाळे स्नेहल कडू, वृषाली खारोडे व कोमल झोड तसेच सांस्कृतिक विभाग, संगीत विभाग, नृत्य विभाग, आर्ट ॲंड क्राफ्ट विभाग यांचे विशेष योगदान लाभले.

## लक्झरी स्टॅन्ड पुलावर साचले पावसाचे पाणी



**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :** शहरातील उडान पूल आता असो अथवा त्याखाली लाखों रुपए खर्च करुण निर्माण करण्यात आलेला अंडरपास यामध्ये पावसाळ्यात नेहमीच पानी वाचण्याची समस्या नेहमीचीच झाली आहे, पावसाळ्यात तर उडान पुलाखाली नागरिकांना धबधब्याचा अनुभव येतो तर दुसरीकडे अंडरपास हा स्विमिंग टँक बनल्याची टीका नागरिक करीत आहेत, आता हेच काय कमी होते की काय आता, लग्जरी बस स्टैंड जवळील पुलावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने वाहन चालकांना तसेच नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे या पुलाचा अधी रस्ता पावसाच्या पाण्याने व्यापला आहे, त्यामुळे अर्ध्या रस्त्यावरून वाहतूक सुरू आहे या पाण्यामुळे हा रस्ता निसरडा झाला आहे त्यामुळे रात्रीच्या वेळी अनेक वाहन चालक घसरून पडल्याने जखमी होत आहेत, जेव्हा एखादे मोठे वाहन या पाण्यातून जाते तेव्हा एखाद्या मोटरसायकल चालकाच्या अथवा नागरिकाच्या अंगावर हे पाणी उडाल्यावर त्यांच्या संतप्त प्रतिक्रिया पहावयास मिळत आहेत, फुलावर साचलेल्या या पाण्या मुळे तसेच रस्ता निसरडा झाल्याने एखादी मोठी दुर्घटना होण्याआधीच या साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी संबंधित विभागाने पावले उचलावीत अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

## निधन वार्ता

### सरस्वतीबाई उज्जैनकर



तेल्हारा येथील प्रतिष्ठीत नागरिक गणेशराव शिवशंकर उज्जैनकर यांच्या मातोश्री श्रीमती सरस्वतीबाई शिवशंकर उज्जैनकर याचे २ जुलै रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले त्याच्या मागे दोन मुले सुना नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या हैदराबादमधील एकात्मिक उत्पादन सुविधेचे उद्घाटन



■ मुंबई,दि. ०५ जुलै :

जगभरात १३ देशांमध्ये ४०० हून अधिक विक्री दालनांसह जागतिक स्तरावरील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठे दागिने विक्रेते असलेल्या, मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने तेलंगणातील हैदराबाद येथे त्यांची अत्याधुनिक, पूर्णपणे एकात्मिक अशी या प्रकारातील सर्वात मोठी दागिने उत्पादन सुविधा सुरू केली आहे. रंगा रेड्डी जिल्ह्यातील महेश्वरम येथील जनरल पार्क येथे स्थित आणि ३.४५ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे अशा प्रकारचे पहिले एकात्मिक उत्पादन केंद्र आहे, जे भारत आणि आखाती देशांमध्ये समूहाच्या कार्यरत असलेल्या १४ उत्पादन सुविधांमध्ये सर्वात मोठे देखील आहे.

या एकात्मिक उत्पादन सुविधेमुळे आभूषण रचना, सोने शुद्धीकरण, दागिने निर्मिती, गुणवत्ता हमी, हॉलमार्किंग, वेअरहाऊसिंग आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यासारखी सर्व महत्त्वाची कार्य एकाच छताखाली आणली गेली आहेत. या केंद्राची वार्षिक उत्पादन क्षमता ४.७ टनांहून अधिक सोन्याचे दागिने आणि १.८ लाख कॅरेट हिऱ्यांचे दागिने निर्मितीची आहे, तसेच वार्षिक सोन्याची शुद्धीकरण क्षमता ७८ टन आहे. १८ राज्यांमधून २,७५० हून अधिक कुशल कारागिरांना रोजगार संधी या केंद्राने दिल्या असून, कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, कल्याण आणि सोयही सुनिश्चित केली आहे. या सुविधेमधील ४० टक्के कर्मचारी हे स्थानिक परिसरांतून भरती केले गेले आहेत आणि एकूण पुरुष-महिला गुणोत्तर ८० मागे २० असे राखले गेले आहे.

तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री रेवंत रेड्डी यांनी या नवीन जनरल पार्क सुविधेचे अधिकृत उद्घाटन मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री एम.पी. अहमद; उपाध्यक्ष श्री अब्दुल सलाम के.पी; मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशर ओ; कार्यकारी संचालक श्री निषाद ए.के. यांच्या उपस्थितीत मलाबार समूहाचे इतर वरिष्ठ व्यवस्थापकीय संघातील सदस्य, तेलंगणा सरकारमधील मान्यवर आणि हितचिंतक यांच्या उपस्थितीत केले.

वाढीव उत्पादन क्षमतांमुळे 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' या दृष्टिकोनानुसार भारत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत समूहाच्या आक्रमक किरकोळ विक्री विस्तारालाही यातून चालना मिळेल. मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची एकूण वार्षिक उत्पादन क्षमता अनुक्रमे ४०.६८ टन आणि ३.६१ लाख कॅरेटपेक्षा जास्त आहे. ज्यामुळे ती जगातील सर्वात मोठ्या दागिन्यांच्या निर्मात्यांपैकी एक बनली आहे.

या सुविधेच्या शुभारंभाबद्दल भाष्य करताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री. एम. पी. अहमद म्हणाले, परंपरा, कला, आधुनिकता आणि अचूकता यांचे मिश्रण असलेले हैदराबादमधील आमचे अत्याधुनिक एकात्मिक दागिने उत्पादन केंद्र हे दागिन्यांच्या उत्पादनात एक नवीन युग सुरू करत आहे. आमच्या 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, ही सुविधा जागतिक बाजारपेठेसाठी भारतात जागतिक दर्जाचे दागिने तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते. भारताला उत्कृष्ट कारागिरी आणि डिझाइन उत्कृष्टतेसाठी जागतिक केंद्र म्हणून स्थान देण्याच्या दिशेने ही सुविधा एक धोरणात्मक झेप दर्शवते. प्रेमाचे शुद्ध प्रतीक म्हणून सोने, प्रेम आणि स्नेहाची अभिव्यक्ती म्हणून वारसा हा कालातीत राहील. मलाबार गोल्ड अँड डायमंड्समध्ये, आम्ही आमच्या विश्वासार्ह आजीवन देखभालाची हमी आणि पारदर्शक बायबॅक गॅरंटीच्या 'मलबार प्रॉमिसेस'द्वारे समर्थित, केवळ सर्वोत्तम सोने आणि हिऱ्याचे दागिने देऊन या वारशाचा सन्मान करतो -प्रत्येक खरेदीमध्ये आम्ही आणत असलेल्या शाश्वत मूल्य आणि अखंडता हा त्याचाच पुरावा आहे.

# स्कोडा ऑटो इंडियाने आतापर्यंतचा सर्वोच्च सहामाही विक्रीचा टप्पा गाठला

■ नागपूर,दि. ०५ जुलै :

स्कोडा ऑटो इंडिया प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, जेथे भारतात २५ वा वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वे वर्ष साजरा करत आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटोने भारतातील आपल्या २५ वर्षांच्या इतिहासामध्ये सर्वोच्च सहामाही विक्री संपादित केली आहे.




स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, ''आमच्या महत्त्वपूर्ण सहामाही विक्रीमधून भारतातील ग्राहकांनी स्कोडा उत्पादने व सर्विसेसचा केलेला अवलंब दिसून येतो. आमच्या ग्राहकांना दररोज विश्वातील सर्वोत्तम स्थळांना एक्स्प्लोअर करायला आवडते. आमच्या पोर्टफोलिओमध्ये कायलॅकची भर करण्यासह आम्ही आता 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'च्या माध्यमातून, तसेच आमच्या सेदान ऑफरिंगच्या माध्यमातून त्यांचा प्रवास अधिक सुखकर व उत्साहवर्धक करत आहोत.

२०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटो इंडिया आता भारतातील टॉप सात ऑटोमोटिव्ह ब्रँड्समध्ये सामील झाली आहे. २०२४ मधील रँकिंगच्या तुलनेत कंपनीने चार पोझिशन्स वर झेप घेतली आहे. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने २०२२ मधील २८,८९९ युनिट्सच्या सर्वोत्तम सहामाही विक्रीला मागे टाकले आहे.

२०२१ मध्ये १२० टचपॉइण्ट्स वरून स्कोडा ऑटो इंडियाने आपले नेटवर्क आजच्या तारखेपर्यंत २९५ हून अधिक टचपॉइण्ट्सपर्यंत विस्तारित केले आहे. कंपनी २०२५ च्या अखेरपर्यंत ३५० टचपॉइण्ट्सचा टप्पा गाठण्याच्या आपल्या ध्येयाप्रती कटिबद्ध आहे, ज्यासाठी भारतभरात विनासायास ग्राहक अनुभव देण्याप्रती कटिबद्धता अधिक दृढ करत आहे.

# महिंद्रातर्फे बीई ६ आणि एक्सईवी ९ई पेक टू चे वितरण जुलैअखेरपासून सुरू

**५९ केडब्ल्यूएच आणि ७९ केडब्ल्यूएच असे दोन्ही पर्याय अनुक्रमे२१.९० लाख रूपये आणि २३.५० लाख रुपयांपासून सुरू**

■ मुंबई,दि. ०५ जुलै :

महिंद्राच्या इलेक्ट्रिक ओरिजन एसयूव्हींनी भारतीय ईव्ही बाजारपेठेत मूल्याच्या बाबतीत अग्रेसर स्थान मिळवले आहे. ग्राहकांचा विश्वास आणि त्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे देशभरात दर दहा मिनिटांना इलेक्ट्रिक एसयूव्हीची विक्री होते.



हा उत्साहवर्धक प्रतिसाद कायम ठेवत महिंद्रा त्यांच्या प्रसिद्ध बीई ६ आणि एक्सईवी ९ई पेक टूचे वितरण जुलैअखेरपासून २१.९० लाख रुपयांना सुरू केले जाणार आहे. ग्राहकांनी दिलेला जोरदार प्रतिसाद लक्षात घेत महिंद्राद्वारे पॅक टु सध्या उपलब्ध असलेल्या ५९ केडब्ल्यूएच व्हेरिएंटबरोबरच ७९ केडब्ल्यूएच बॅटरी पर्यायात उपलब्ध केला जाणार आहे. या व्हेरिएंटद्वारे अनुक्रमे ५०० किमी आणि ४०० किमी रेंज शहरात मिळणार आहे.

दोन्ही बॅटरी पर्यायांमध्ये महिंद्राचे अत्याधुनिक तंत्रज्ञान, १६ स्पीकर हर्मन कार्डन साउंड सिस्टीम डॉल्बी अटमॉस, संपूर्ण काचेचे छत, २ लेवल अत्याधुनिक, ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम्स (लेल २ एडीएएस), एक्सईवी ९ई मध्ये ट्रिपल स्क्रीन वाइड सिनेमास्कोप, बीई ६मध्ये रेस रेडी डिजिटल कॉकपिट इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत. या सुविधांमध्ये नाविन्य, सुरक्षा व आधुनिक आलिशानता यांचा मेळ घालण्यात आला आहे. त्याशिवाय महिंद्रा बीई ६ पेक टू मध्ये पॅक थ्रीप्रमाणे प्रीमियम सेज लेदरचे इंटेरियर्स देत असून त्याला केबिनचा प्रशस्त व अभिजात स्वरूप उंचावण्यासाठी उच्चभ्रू आयव्हरी रूफ फिनिशची जोड देण्यात आली आहे.

प्रतीक्षेत असलेल्या सर्व ग्राहकांना त्यांचे बुकिंग नवीन पेक टू ७९ केडब्ल्यूएच व्हेरिएंटमध्ये अपग्रेड करण्याची संधी असून त्यातून महिंद्राची ग्राहकांच्या आवडीप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्याची बांधिलकी दिसून येते.

२१.९० लाख रुपयांपासून सुरू होणाऱ्या पॅक टु द्वारे महिंद्राचे प्रीमियम इलेक्ट्रिक वाहतुकीचे आश्वासन आणखी दृढ होत असून कंपनी डिझाइन व तंत्रज्ञानात आघाडीवर आहे. महिंद्राचे सर्व्हिस नेटवर्क भारतात ३०० ठिकाणी कार्यरत असून ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार कुठेही जाऊन मनासारखी सेवा मिळवता येईल.

# शाहरुख खान यांच्या हस्ते सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचे भव्य उद्घाटन

■ मुंबई,दि. ०५ जुलै :

दक्षिण आशिया, सज्ज व्हा! बॉलिवुडचा वादातीत बाहशहा शाहरुख खान श्रीलंकेला एका अप्रतिम सोहळ्यासाठी भेट देण्यास सज्ज झाला आहे. २ ऑगस्ट २०२५ रोजी सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवली.



किंग खान अशी ओळख असलेल्या, अनेक पुरस्कारांनी सन्मानित या सुपरस्टारची निमंत्रितांसाठी असलेल्या या भव्य उद्घाटन सोहळ्यातील उपस्थिती म्हणजे दक्षिण आशियातील या पहिल्या लक्झ्युरी समावेशक रिसॉर्टचे महत्त्व ठळकपणे दाखवून देणारी कृती होती. जॉन केल्स होल्डिंग्स आणि मेल्को रिसॉर्ट्स अॅण्ड एंटरटेनमेंटच्या लक्षणीय भागीदारीतून हे रिसॉर्ट विकसित करण्यात आले आहे.

सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचा भव्य उद्घाटन सोहळा २०२५ मधील या भागातील सर्वात ग्लॅमरस सोहळा म्हणून ओळखला जाईल. यावेळी रिसॉर्टच्या लेट्स गो, लेट गो या मोहिमेचाही अधिकृतरित्या शुभारंभ करण्यात आला. यातून लक्झ्युरी आणि मनोरंजनाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे बहूविध खाद्यानुभव, सौंदर्यपूर्ण हॉटेल रूम्स, तुम्हाला ताजेतवाने करणारे वेलनेस रीट्रिट्स, लक्झ्युरी रिटेल अनुभव आणि देशातील सर्वात मोठी आणि सर्वाधिक सौंदर्यपूर्ण मिटिंग आणि इव्हेंटसाठीची जागा अशा विविध प्रकारच्या आकर्षक सोयीही उपलब्ध झाल्या आहेत.

या एकात्मिक रिसॉर्टमध्ये जागतिक दर्जाचा, मेल्को रिसॉर्ट्स अॅण्ड एंटरटेनमेंटतर्फे संचालित कॅसिनोही आहे. मेल्कोचा लक्झ्युरी हॉटेल ब्रँड नुवा इथे सुरू झाल्याने कोलंबोमधील उत्कृष्ट आदरातिथ्य सेवांमध्ये मोलाची भर पडली आहे.

कॅलेंडरमध्ये तारीख नोंदवून ठेवा २ ऑगस्ट २०२५ आता कोलंबो कायमचे बदलणार आहे.

# झी टीव्ही प्रस्तुत करत आहे तुम से तुम तक

**वय आणि वर्गभिदाच्या पलीकडील प्रेमकथा !**

■ मुंबई,दि. ०५ जुलै :

भारतीय समाजात नातेसंबंध आणि विवाह हे अनेकदा जुन्या परंपरांवर आधारित असतात वय, आर्थिक स्थिती आणि सामाजिक पार्श्वभूमी यांना खूप महत्त्व दिले जाते. पण प्रेम कधीच ह्या नियमांना पाळत नाही ते स्वतःचा मार्ग शोधते आणि अनेकदा रूढी मोडून पुढे जाते. अशाच एक अनोख्या आणि आधुनिक प्रेमकथेवर आधारित झी टीव्ही घेऊन येत आहे एक नवीन मालिका तुम से तुम तक, जी प्रेमाच्या अशाच अनोख्या प्रवासाला सुंदर पद्धतीने सादर करते.



ही कथा आहे अनु आणि आर्यवर्धन यांच्या अनोख्या नात्याची अनु ही १९ वर्षांची मध्यमवर्गीय मुलगी आहे आणि आर्यवर्धन हा ४६ वर्षीय स्वतःच्या मेहनतीने पुढे आलेला एक व्यावसायिक आहे. वय, सामाजिक दर्जा आणि जीवनशैलीत प्रचंड फरक असतानाही त्यांच्या हृदयात प्रेमाचा अंकुर फुटतो, आणि समाजाच्या अपेक्षांना आव्हान देणारी एक नवी कहाणी सुरू होते. ही नवी मालिका झी टीव्हीच्या आपका अपना झी टीव्ही या ब्रँड विचारधारेअंतर्गत सादर होणाऱ्या महत्त्वाच्या कथा संकल्पनांपैकी एक आहे.

ती झी कन्नडवरील प्रचंड यशस्वी मालिका जोथे जोथियाली यावरून प्रेरित आहे. स्टुडिओ एलएसडी प्रा. लि. निर्मित तुम से तुम तक या मालिकेचा प्रीमियर ७ जुलैपासून होत असून दररोज संध्याकाळी ८:३० वाजता ही झी टीव्हीवर प्रसारित होईल.


॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥

## पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

**स्वच्छ भारत अभियान स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण 2025 व माझी वसुंधरा 6.0**

**आषाढी यात्रा 2025**

**यात्रेकरुंना व भाविकांना नम्र आवाहन**

**माझ्या विठ्ठलाची पवित्र पंढरी**

**स्वच्छ,सुंदर,हरित ठेवण्याची माझ्यासह प्रत्येकाची जबाबदारी**

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरुंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.


1) यात्रेकरु,दिंडीकरी,फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर 65 एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.
2) उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.
3) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.
4) **पत्रावळी व द्रोणचा वापर** :- जेवणाकरीता थर्माकोल,प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याएवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा,द्रोणचा वापर करावा व प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.
5) **कचरा व्यवस्थापन** :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ.तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकु नये.
6) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टॅकरचे पाणी प्यावे.
7) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.
8) धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.
9) **पार्कींग व्यवस्था ठिकाणे** :- भिमा बस स्टँड मोहोळ रोड , ६५ एकर मागील बाजु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल,अंबाबाई पटांगण, इसबावी विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग, यमाई तुकाई पार्किंग, बिडारी बंगला पार्किंग, गजानन महाराज मठ क्र.१, एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी, ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग,६५ दिंडी परिसर वाहन,सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

(श्री.सचिन इथापे)
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

(श्री.महेश रोकडे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर


# शब्दकोडे क्रमांक २१५६



**आडवे शब्द :-**

१) फौजेबरोबर असणारी अवांतर माणसे
६) गदा घेतलेला
१०) हाक, प्रतिसाद
११) अन्यायाचे, बेकायदेशीर
१३) जास्त
१४) तृष्णा
१६) तेज, कांती
१८) नम्र, वाकलेला
२०) सामुद्रीवाहन
२३) टिकून राहाणे
२४) प्रस्थान करणे
२६) कडक
२७) दीन, दुबळ्यांवर दया करणारा
२९) थंडावा
३१) दाद
३३) चंद्र
३४) जास्तीचे, गणितातील मिळविणे
३६) माणूसकी
४१) प्रेत वाहून नेताना म्हणावयाचे शब्द
४४) हिंदुस्थान
४६) शिकारीचा प्राणी
४८) श्रीमंत
५०) प्रतिष्टा, अब्रू
५१) त्या प्रकारचा
५२) थरथरणे
५४) दृढ, पक्का, कायम
५६) धैर्य, हिंमत
५८) घाबरणे
६०) संगमरवरी दगड
६२) अंगठ्या जवळचे बोट
६४) सोवळ्यातील रेशमी वस्त्र
६५) गेरू
६६) वेल
६८) मऊ
७०) येथे जाणे म्हणजे नाश पावणे, बुडणे (वा.प्र.)
७३) चामखीळ
७४) सारखा
७६) गणक, मोजणारा
७७) शर्करा
७८) चणचण, दुर्भिक्ष
८०) बाज विणण्याची सुती पट्टी
८२) काठोकाठ
८४) फायदा, प्राप्ती
८५) दृष्टीभेट
८६) आणि

**उभे शब्द :-**

१) निराधार बातमी, अफवा
२) पृथ्वी
३) चर्मपात्र, कुपी
४) निवासस्थान
५) नाजूक
६) गणपती
७) मोठा भाऊ
८) पद्धत
९) जन्म मृत्यू
१२) राजाची मुलगी
१५) हस्त
१७) यज्ञ
१९) नटणारा
२१) सूची
२२) मूळ आधार
२५) हिमालय
२८) प्रिय स्त्री
३०) रक्कम, ठराविक पैसे
३२) एक ग्रामदेवता
३५) एक हजार गॅम
३७) दुष्ट
३८) वांती
३९) महान, मोठा
४०) सामान्य
४२) सिनेमा
४३) हिस्सा, वाटा
४४) अवधान, चित्त
४५) बारा वर्षाचा काळ
४७) वस्ती
४९) उपयोग
५०अ) बूड
५३) पाताळ, यमराज्य
५४) पोलीसचौकी
५५) रबरी चपला
५७) ऑपरेशन करणारा डॉक्टर (इं.)
५९) कदर करणारा
६०) त्रिफळातील आंबट फळ
६१) मनाला लागलेली टोच
६३) फोडणी दिलेले ताक
६६अ) दिवस
६७) आभाळ
६९) मला
७१) उंट हाकणारा
७२) संतोष, आनंद
७३) महिरप
७५) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
७७) आधारासह
७९) फक्त, केवळ
८१) पराग
८३) प्रतिदिनी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



महासागर

●रविवार,दि.६ जुलै २०२५

अकोला



# लैगिंक अत्याचार केल्याबद्दल आरोपीला २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**अकोटः** जिल्हा व सत्र न्यायाधीश व विशेष न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत पोक्सो कायद्या मधील आरोपी दिनकर दांडगे एदलापूर याने ४ वर्षीय चिमुकलीवर लैगिंक अत्याचार केल्याचे सिध्द झाल्याने आरोपीला २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ६०,०००/- रूपये दंडासह ठोठावली आहे.या प्रकरणाची हकीकत अशी, ४ वर्षीय पिडीतेच्या वडिलांनी हिवरखेड पोलिस स्टेशनला फिर्याद दिली की, ०४.०७.२०२१ रोजी संध्याकाळी ४ वर्षीय पिडीतामुलगी घराबाहेर रस्त्यावर खेळायला गेलीहोती. गावातील एका महिलेने आम्हाला सांगितले आहे की, तुमच्या अल्पवयीन मुलीला आरोपी दिनकर दांडगे याने सांगोळे विद्यालयाच्या मागे नेले आहे. आम्ही बॅटरी लावून पाहिले असता त्या ठिकाणी आरोपी दिनकर दांडगे हा उभा होता.

आम्हाला पाहून तो तेथून पळून गेला. मुलीच्या सांगण्यानुसार लैंगिक अत्याचार केल्याचे दिसून आले. आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करून आरोपीला हिवरखेड पोलीसांनी ०५.०७.२०२१ रोजी अटक केली. तेव्हा पासून आरोपी या प्रकरणात अकोला कारागृहामध्ये बंदिस्त आहे.या प्रकरणात हिवरखेड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षकविठ्ठल वाणी यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या प्रकरणात एकूण १२ साक्षीदारांच्या साक्षी सरकारी वकील ॲड. प्रार्थना सहारे यांनी नोंदविल्या.

# विद्यार्थिनीचा ऑटोरिक्षा चालकाकडून विनयभंग

## अज्ञात स्थळी नेत अत्याचाराचा प्रयत्न,आरोपीस अटक

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

शहरातील सिविल लाइन्स पोलीस स्टेशन हद्दीत आणखी एक धक्कादायक प्रकार उजेडात आला. काल शुक्रवार ४ जुलै रोजी सायंकाळी एका विद्यार्थिनीचा ऑटोरिक्षा चालकाने विनयभंग करुन तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र मुलीने प्रसंगावधान राखत स्वतःचा बचाव केल्याने पुढील अनर्थ टळला. बाहेरगावहून शिकवणी करिता येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अकोला असुरक्षित असल्याचे या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

नायगाव येथील रहिवासी जाफर सुभेदार खान असं आरोपीचे नावं असून, त्याला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. सिव्हिल लाईन पोलिस स्टेशनच्या निरीक्षक मालती कायते यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दोन तासाच्या आत आरोपीला अटक केली.याबाबत मुलीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, पीडित मुलगी अकोला मध्यवर्ती बस स्थानकापासून



रूमकडे ऑटोरिक्षाने जात असताना या ऑटोरिक्षा चालकाने तिचा विनयभंग केला. त्याच्या तावडीतून सुटकेसाठी तिने प्रतिकार केला. मात्र, रिक्षा चालकाने तिच्या हाताला आणि दंडाला चावा घेतला. त्यानंतर रिक्षातून तिने पळ काढला. यानंतर मुलीने पोलीस स्टेशन गाठून रीतसर तक्रार नोंदविली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्ह्याची नोंद करून लगेच तपास हाती घेतला. मुलीच्या तक्रारीवरून सिव्हिल लाईन पोलिसांनी ऑटोरिक्षा चालकाला अटक केली. जाफर खान सुभेदार खान (रा.बकेट कारखान्या जवळ शहनवाजपुरा, नायगाव, अकोला.) असं अटक करण्यात आलेल्या रिक्षा चालकाचं नाव आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील एक १६ वर्षीय विद्यार्थिनी ही अकोला शहरात नीट परीक्षा छएएढ एदअच चे क्लासेस करीत आहे. त्यासाठी तिने राहायला खोली भाड्याने केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून ती आजारी होती. त्यामुळे परतवाडा येथे गावी गेली होती. काल दुपारी एस टी बसने अकोल्याकडे रवाना झाली. सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास ती अकोला बसस्थानकावर पोहचली. त्यानंतर खोलीवर जाण्यासाठी एक ऑटोरिक्षा ठरविला, आणि त्यामध्ये बसून रूमकडे रवाना झाली. मात्र ऑटो रिक्षा चालकाने ऑटोरिक्षा वेगळ्याच रस्त्यावर नेला, तिला संशय आल्याने तिने मित्राला फोनवर सांगितलं. दरम्यान, अगदी थोड्या वेळातच चालत्या रिक्षात चालकाने मुलीचा हात पकडून स्वतःजवळ ओढत तिचा विनयभंग केला. पीडित मुलीने प्रतिकार केला असता त्याने मुलीच्या डाव्या हातावर आणि हाताच्या दंडाला चावा घेतला. थोड्या वेळातच तिने हिमतीने स्वतःची सुटका करत ऑटोरिक्षा मधून पळ काढला. आणि थेट सिव्हिल लाईन पोलीस ठाणे गाठले. घडलेला प्रकार पोलिसांना सांगत रीतसर तक्रार नोंदवली. पोलिसांनी विनाविलंब घटनेचे गांभीर्य ओळखून रिक्षा चालकाचा शोध घेत आरोपीस ऑटोरिक्षासह अटक केली. पीडित मुलीने ऑटोरिक्षाचा क्रमांक ऑटोरिक्षामध्ये बसण्याआधीच नोंद केला होता. त्यामुळे पोलिसांना ऑटो चालकाचा शोध घेण्यास मोठी मदत मिळाली. भारतीय न्याय संहिता कलम ७४,११८,(१),१३७ (२) सहकलम ८ पॉक्सो नुसार जाफर खान सुभेदार खान याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच गुन्ह्यात वापरलेला एमएच ३० ई ९४९७ या क्रमांकाचा ऑटोरिक्षा सुद्धा पोलीसांनी ताब्यात घेतला आहे. अकोला शहरातील मुख्य पोस्ट ऑफिस रोड ते अनोळखी ठिकाणी ही घटना घडली आहे. अकोला शहरात बाहेरगावाहून विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठया संख्येने शिक्षणासाठी येतात. मात्र त्यांच्याकडून शहरातील सराईत गुन्हेगार खंडणी मागतात. खंडणी न दिल्याने विद्यार्थ्यांना मारहाण होते, असे बरेच गुन्हे उघडकीस आले आहेत. एका विद्यार्थ्याची केवळ पन्नास रुपयांसाठी हत्या झाली. तर एका विद्यार्थ्याने या गावगुंडांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली होती. तर काहींना मारहाण झालेली आहे. या संदर्भात अनेक तक्रारी दाखल आहेत, परंतू पोलिसांकडून कडक कारवाई होत नसल्याने दिवसागणिक या गाव गुंडांची दहशत वाढत आहे. बाहेरगाााहून अकोला शहरात येणाऱ्या प्रवाश्याची ऑटोरिक्षा चालकांकडून फसवणूक होत असल्याचे समोर येत आहे. यातूनच एक गंभीर घटना देखील घडली होती. ३१मार्च २०२३ रोजी अकोल्यात ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली होती. बस स्थानकावर पत्ता विचारणाऱ्या अंध महिलेवर तिच्या अंध पतीसमोरच ऑटोरिक्षा चालकाकडून अत्याचार झाल्याचा घृणास्पद प्रकार उजेडात आला होता. या प्रकरणात आरोपी गुलाम रसुल शेख मतीनला पोलीसांनी अटक केली होती. एक अंध दाम्पत्य अकोला जिल्ह्यातील दिग्रस येथे आपल्या नातेवाईकाकडे जात होते.

# धामणा येथे कॉलरा साथ; उपाययोजना सुरू

## नागरीकांनी पाणी शुध्दीकरण करुनच प्यावे

**■आकोट,,दि ५ (प्रतिनिधी) :**

अकोट येथील नागरीकांनी पाणी शुध्दीकरण करुनच प्यावे. दि. ०५.०७.२०२५ मौजे धामणा ता. अकोट या गावामधील एक ५० वर्षीय पुरुष रुग्ण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उपचार घेत असतांना प्रयोगशाळा चाचणीत कॉलरा बाधीत आढळुन आला. सदर रुग्ण छातीत दुखत असल्याने दि. १.७.२०२५ रोजी सकाळी भरती झाला परंतु दि.२.७.२०२५ रोजी सकाळी रुग्णाचा मृत्यु झाला. त्यावेळी कॉलरा बाधीत असल्याचा प्रयोगशाळा अहवाल तपासणीची कार्यवाही सुरु होती व कॉलरा बाधीत असल्याचा अहवाल दुपारी प्राप्त झाला. त्यानुषंगाने कॉलरा उद्रेक प्रतिबंध संदर्भाने जिल्हास्तरीय पथक व तालुका स्तरीय पथकाने मौजे धामणा ता. अकोट प्रत्यक्ष येथे जावुन प्रतिबंधात्मक तथा उपचारात्मक कार्यवाही अंमलात आणण्याचे अनुषंगिक कार्यवाही केली. त्यानुसार दि. ३.७. २०२५ रोजी कॉलरा उद्रेक जाहीर करण्यात आला.सदर साथीच्या अनुषंगिक माहिती आज दि. ५.०७.२०२५ पर्यंतची रुग्ण माहिती ( ४.०० वाजेपर्यंत) आज एकुण सर्व्हेक्षण पथके एकुण घरे ८० आज तपासणी केलेली घरे एकुण लोकसंख्या – ३०३ ८० आज तपासणी केलेली लोकसंख्या ३०३ आजची ओपीडी रुग्णांची एकुण संख्या २ पैकी ताप, मळमळ, पोटदुखी, हगवण डोकेदुखी ओपीडी मधील रुग्णांची संख्या पैकी संदर्भीत केलेल्या रुग्णांची संख्या आज बरे झालेल्या रुग्णांची संख्या

सध्या उपचाराखाली असलेल्या रुग्णांची संख्या घेतलेले शौच नमुने घेतलेले पाणी नमुने घेतलेले रक्तनमुने – १० प्रगतीपर – उद्रेक सुरु झाले पासुनची रुग्ण माहिती प्रगतीपर सर्व्हेक्षण पथके प्रगतीपर तपासणी केलेली घरे – ८० प्रगतीपर तपासणी केलेली लोकसंख्या प्रगतीपर ओपीडी रुग्णांची एकुण संख्या ३०३ ६ पैकी प्रगतीपर ताप, मळमळ, पोटदुखी, डोकेदुखी ओपीडी मधील रुग्णांची संख्या पैकी प्रगतीपर संदर्भीत केलेल्या रुग्णांची संख्या प्रगतीपर बरे झालेल्या रुग्णांची संख्या प्रगतीपर घेतलेले शौच नमुने आहेत.

# अल्पवयीन मुलास दुचाकी चालविण्यास देणाऱ्या वडिलांविरूद्ध गुन्हा

**■मुर्तिजापुर,दि ५ (प्रतिनिधी) :**

शहरात अल्पवयीन मुलास परवाना मिळण्याकरिता पात्र नसतानासुद्धा त्याला वाहन चालविण्यास देणाऱ्या येथील पित्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही पहिलीच घटना असल्याने अशा कारवाईमुळे नक्कीच अपघातात कमालीची घट होणार आहे. येथील वडर पुऱ्यातील मनोज मारोती कराळे (४६) याने त्याचा अल्पवयीन मुलगा यास त्याच्या ताब्यातील दुचाकी (क्रमांक एमएच ३० बीई ९३८६) चालविण्यास दिली. सदर दुचाकीवर वर दोघे बसून भरधाव वेगाने चालवून लोकांच्या सुरक्षिततेत बाधा निर्माण करीत बेदकारपणे चालवित असताना आढळून आला.

## रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांविषयी

# तरुण पिढीमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

दिनांक ०५ जुलै २०२५: तरुण पिढीने रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांबाबत सजग व्हावे तसेच विविध पथचिन्हांचे अर्थ समजून घ्यावेत, या उद्देशाने दिनांक ०२ जुलै २०२५ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अकोला येथे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या वतीने एक मनोरंजक आणि शैक्षणिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला माननीय प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. रवींद्र भुयार आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यशाळेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. दिव्येश उबाळे यांनी विद्यार्थ्यांना रस्त्यावर वाहन चालवताना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन आणि पथचिन्हांचे महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले. रस्ता सुरक्षा शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित



करताना, त्यांनी सांगितले की, विशेषतः लहान मुले रस्त्यावर असताना अपघात आणि जखमांचा धोका जास्त असतो. चालताना, सायकल चालवताना किंवा इतर वाहनांचा वापर करताना मुले असुरक्षित असतात. रस्ता सुरक्षेचे शिक्षण त्यांना सुरक्षित राहण्यास आणि अपघात टाळण्यास मदत करते.

रस्ता सुरक्षा शिक्षणामुळे मुलांना रस्त्यांचा सुरक्षितपणे वापर कसा करावा हे समजते, ही शिदोरी त्यांच्या आयुष्यभर उपयोगी ठरते. यामध्ये वाहतूक नियमांचे पालन, रस्ता ओलांडण्यापूर्वी दोन्ही बाजूंनी पाहणे, आणि वाहनात सीटबेल्टचा वापर यासारख्या सवयींचा समावेश आहे. लहान वयातच या सवयी अंगीकारल्यास, प्रौढावस्थेतही त्या कायम राहतात, ज्यामुळे रस्त्यावरील अपघात आणि जखमांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

# अहिल्यादेवी शिशुवाटीकेमध्ये भरला वारकऱ्यांचा मेळा



**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

स्थानिक बी. आर. हायस्कूल अंतर्गत व विद्याभारती संचालित अहिल्यादेवी शिशुवाटीकेमध्ये आषाढी एकादशी च्या पावन पर्वानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.लहान लहान विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुख्मिणी व वारकरी यांची वेशभूषा केली होती, गळ्यात तुळशीची माळ, हातात झेंडे घेऊन दिंडी सुद्धा काढली. वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी यावेळी पाऊली, फुगडी खेळून रिंगण तयार केले. अतिशय नेत्रसुखद आणि उत्साहात हा कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका नंदिनी माई यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षिकावृंदानी केले.

# वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरमध्ये पूनम कैथवास ची निवड

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया व भारतीय



खेळ प्राधिकरण (SAI) द्वारा दिनांक ०२ ते २० जुलै २०२५ दरम्यान पटियाला (पंजाब) येथे आयोजित वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरामध्ये पूनम कैथवास हिची निवड ६०कि. वजनगटात झाली आहे. पूनम ला यावर्षी महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित पुरस्कार शिव छत्रपती मिळालेला आहे. पूनम ही यापूर्वीची वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा पदक विजेता, ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सुवर्ण पदक विजेता तसेच खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये पदक विजेता खेळाडू आहे.आगामी एशियन गेम्स २०२६, कॉमनवेल्थ गेम्स तसेच लॉस एंजलिस येथील २०२८ च्या ऑलिम्पिकसाठी हे प्रशिक्षण शिबिर महत्त्वपूर्ण आहे.

# वाशिंबा येथील जिल्हा परिषद शाळेत गुणवंतांचा सत्कार



**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या वाशिंबा जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेतील विद्यार्थी प्रणव संतोष तायडे वर्ग२ रा, कुमारी सौम्या निलेश धांडे वर्ग ६ या विद्यार्थ्यांनी भारत टॅलेंट परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा जिल्हा परिषद शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र, शील्ड देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला मुख्याध्यापक जायभाये सर, अनघा कुलकर्णी, शिवाली पेशकर मॅडम, श्रीकृष्ण तायडे शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ फुलचंद वानखडे, अध्यक्षा अरुणा वानखडे ,रूपाली शिंदे ,जयश्री धांडे, शितल शिंदे, मंगेश सानप ,संतोष गुळवे, संतोष तायडे आदी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रणव संतोष तायडे या विद्यार्थ्याने जिल्ह्यातून दुसरा क्रमांक प्राप्त केला असून सौम्या निलेश धांडे या विद्यार्थिनींनी केंद्रातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

# मतदार याद्या अचूक करण्यासाठी बीएलओ,पर्यवेक्षकांना प्रशिक्षण



**अकोट :** निवडणूक आयोगाव्दारे घेण्यात येणाऱ्या सर्व निवडणुकांकरिता मतदार नोंदणी प्रक्रिया अचूक व कार्यक्षमपणे पार पाडण्याकरिता कार्यरत सर्व बीएलओ व पर्यवेक्षकांना भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांचे मार्गदर्शनात अकोट तहसील कार्यालयात प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणाला अकोट तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, तेल्हारा तहसीलदार समाधान सोनवणे, निवडणूक नायब तहसीलदार सुभाष सावंग व संजय ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पॉवर पाइंटच्या माध्यमातून पर्यवेक्षक संजय बेलुरकर यांनी कृतीशील प्रशिक्षण दिले तर बीएलओ ॲपचे प्रशिक्षण समन्वयक महेंद्र राऊत यांनी दिले. यावेळी बीएलओ यांच्या समस्यांचे समाधान उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी केले. प्रशिक्षण यशस्वी करण्याकरिता ऑपरेटर सिंध्दात वानखडे व नंदकुमार पचांग यांचे सहकार्य लाभले. अकोट तहसील कार्यालयाच्या सभागृहात अकोट तालुक्यातील १८६ व तेल्हारा तालुक्यातील १६० असे एकुण ३४६ बीएलओ व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# आषाढी एकादशीनिमित्त शाळेत वह्यांचे वाटप!



**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

आज आषाढी एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर अकोला येथील अस्मिता इंग्लिश प्राइमरी स्कूल व रुक्मिणी शिशु मंदिर या शाळेत रामनवमी शोभायात्रा समिती व जानकी वल्लभौ मातृशक्ती सत्संग मंडळा तर्फे विद्यार्थ्यांमध्ये वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता, तसेच उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी शाळेच्या पटांगणात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अर्चनाताई शर्मा तसेच जानकी वल्लभौ मातृशक्ती मंडळाच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होते.पाहुण्यांनी आपल्या भाषणात आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगितले आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. 'शिक्षण हेच आपल्या जीवनातील खरे धन आहे आणि या धनाचा योग्य वापर करूनच आपण आपले भविष्य घडवू शकतो,' असे प्रतिपादन त्यांनी केले.शाळेचे मुख्याध्यापक यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरच्या विठोबाचे स्मरण करून आपण समाजोपयोगी कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

विद्यार्थ्यांना वह्यांची मदत मिळाल्यास त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल, अशी आमची अपेक्षा आहे.'यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वह्या मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसत होते. हा उपक्रम शाळेच्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला असून, यापुढेही असे उपक्रम राबविण्याचा मानस शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला.

# संत शिरोमणी गोरोबा काका यांचा ७५८ वा जन्म उत्सव



**■अकोला : संत** शिरोमणी गोरोबाकाका जन्मोत्सव सोहळा दिनांक ५/७/२०२५ रोजी संत गोरोबाकाका मंदिर गजानन नगर ढबकी रोड येथे समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळेस अकोला जिल्ह्यातील समाज बांधवांनी उपस्थित राहून पूजन व आरती करून जन्मोत्सव साजरा केला कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ तथा मंदिर समितीचे अध्यक्ष श्री रामकृष्णजी साविकार तसेच डॉक्टर नाना सौदागर व पुंडलिकरावजी वनकर यांचे प्रमुख मार्गदर्शनामध्ये संत गोरोबाकाका जयंती साजरी करण्यात आली.

# अकोला पोलीसांकडुन नाकाबंदी दरम्यान सार्वजनीक ठिकाणी दारू पिणाऱ्या ७९ इसमांवर ठोस कारवाई

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच नागरिकांना सुरक्षित आणि शांततामय वातावरण मिळावे त्याकरीता मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक यांनी जिल्हयात ऑपरेशन प्रहार व आकरमीक नाकाबंदी चे आयोजन करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिणाऱ्या इसमांवर तसेच अवैध जुगार विरूध्द कडक कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.

दिनांक ०४.०७.२०२५ रोजी शहरातील पोस्टे एमआयडीसी, पोस्टे बार्शिटाकळी या हददी मध्ये जुगार कारवाई करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ०४ आरोपीतांकडुन ८९,२३६/- रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच जिल्हयात १९.०० वा ते २३.०० पावेतो आकस्मीक नाकाबंदीचे आयोजन करून पो.स्टे स्तरावर विशेष पथके तयार करून तसेच नाकाबंदी चे फिक्स पॉईट नेमुण वाहन चेकींग करण्यात आली तसेच सार्वजनीक ठिकाणी दारू पिउन, गोंधळ घालणे, शांतता भंग करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ७९ इसमांवर मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत ती कार्यवाही करण्यात आली. तसेच संपुर्ण जिल्हयात नाकाबंदी राबवुन नाकाबंदी दरम्यान जिल्हयातील एकुण २४ नाकाबंदी पॉईट वर ९३७ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये २२४ कारवाई करून १,०७,४५०/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अनव्ये ०१ केस करण्यात आली आहे.अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांपासून नागरीकांनी दूर राहावे, आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अकोला पोलिसांकडून अशा प्रकारचे विविध प्रतिबंधक उपयोजना अधिक



तीव्रतेने राबवुन, कायदा मोडणाऱ्यांवर कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही. करीता सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि शहराच्या शांततेत योगदान द्यावे व नागरिकांच्या सहकाऱ्यानेच शहरात शांतता व सुव्यवस्थाराखली जाऊ शकते, असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी केले आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण ननमुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण ननमुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

अमृतवाणी

## पुंडलिकें प्रकट केलें असे

अवीट अमोला घेता पैं निमोला।
तो प्रत्यक्ष देखिला भीमातटीं।।
अव्यक्त साकार अकारिला अंकूर।
क्षरला चराचर भक्तिकाजे।।
अनुमान विटे सर्वाघटींमाजिटें।
तें परब्रह्म ईटें भक्तिसाह्य।।
निवृत्ति घनवट पिकलिसे पेठ।
पुंडलिकें प्रकट केलें असे।।

– संत निवृत्तीनाथ



## वारी, भक्तीचा उद्‌घोष

भक्ती विशेष

वैजयंती कुलकर्णी

**महाराष्ट्राला वारीची संपन्न परंपरा लाभलेली आहे. जातीधर्माच्या भिंती तोडत, सर्वांप्रती समभाव आचरत, सहिष्णुता-बंधुता-समानतेचा उद्‌घोष करत वारकारी संपद्राय पंढरीच्या वाटे चालू लागतो तेव्हा भक्तीप्रवाहाचं ते विशाल रूप मनाचा ठाव घेतं. अलिकडच्या काळात काही नवे विचार रुजवण्यासाठी, समाजभान जागृतीसाठी, प्रबोधनासाठीही वारी हा एक महत्त्वपूर्ण सोहळा ठरत आहे.**



सर्व संतांच्या पालख्या पंढरीची वाट चालू लागतात आणि एक अपूर्व सोहळा रंगू लागतो. वारी प्रत्येकाच्या मनात शाश्वत मूल्यांची पेरणी करत असते. आषाढी वारीला जास्त प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रातील आणि खानदेशातील वारकरी असतात तर कार्तिकी एकादशीत विदर्भ आणि मराठवाड्यातील वारकरी असतात.

पंढरपूरचं विठ्ठल मंदिर, त्याला मानणारा भक्त संप्रदाय आणि विठुरायाचं गुणवर्णन करणारं आपलं संतवाङ्‌मय हा मराठी संस्कृतीचा गाभा आहे. शंकराचार्यांनीसुद्धा भीमेच्या काठावरील पांडुरंगाचं वर्णन केलेलं आहे. वारीची परंपरा कमीत कमी हजार वर्षांची असावी असं जाणत्या लोकांचं मत आहे. महाराष्ट्रात अनेक राजकीय स्थित्यंतरं झाली, परकीय आक्रमणं झाली तरीही वारीची परंपरा अखंड सुरू राहिली. पांडुरंग म्हणजे सगळ्या संतांचा सखा... संत तुकाराम म्हणतात,

**'आमुची मिरासी पंढरी।**
**आमुचे घर भीमातीरी।।**
**पांडुरंग अमुचा पिता।**
**रखुमाई आमची माता।।**
**भाऊ पुंडलिक मुनी।**
**चंद्रभागा आमुची बहिणी।।**
**तुका जुनाट मिरासी।**
**ठाव दिला पायापाशी।।'**

विठ्ठलावरील प्रेम, त्याची ओढ आणि विठ्ठलाविषयी असणारी सख्यभक्ती सर्व संतांच्या म्हणजेच नामदेव, ज्ञानदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, निळोबा, गोरा कुंभार, सावतामाळी आदींच्या लेखणीतून दिसून येते. हाच विचार भक्तीसंप्रदायाला समृद्ध करतो.

न्या. रानडे यांनी वारकरी संप्रदायाला भागवत धर्म म्हटलं आहे. चंद्रभागेच्या तीरावर उभ्या असणाऱ्या सावळ्या परब्रह्माला सर्व संतांनी आपलंसं केलं आहे. भागवत धर्माचं आणि सगुण भक्तीचं नवं तत्त्वज्ञान सांगितलं आहे. ही परंपरा उदार धर्माचा पुरस्कार करणारी आहे. सर्व संतांनी सहिष्णुतेचा, चित्तशुद्धीचा आणि सर्वांभूती समत्त्वानं पाहण्याचा उपदेश केला. रंजल्या-गांजल्यांची सेवा करावी, सर्वांना सारखाच दया धर्म दाखवावा हीच या संपन्न परंपरेची शिकवण आहे.

वारकरी संप्रदाय हा सर्वांसाठी खुला आहे. लोकजीवनाशी मिळून मिसळून वागणारा आहे. म्हणूनच हा एक प्रवाही संप्रदाय आहे. वारकरी कोणाला म्हणावं याचे काही निकष आहेत. त्यात नियमित वारी करावी, कपाळावर गोपीचंदनाचा टिळा लावावा, गळ्यात तुळशी माळ घालावी, मद्य-मांस खाऊ नये आणि दररोज हरीपाठाचे अभंग म्हणावे हे अभिप्रेत आहे. म्हणजेच ही वारकऱ्यांची वैशिष्ट्यं आहेत. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मांमध्ये पसरला आहे. एकदा तरी पंढरीला जाऊन विठुरायाचं दर्शन घ्यावं ही इच्छा महाराष्ट्रातील प्रत्येक विठुभक्ताच्या मनात असते.

पंढरपूरची वारी कुटुंबातील काही व्यक्ती एकत्रितपणे अथवा काही स्वतंत्रतेनं करतात. काही जण आपल्या गावातील दिंडीत सहभागी होऊन वारीला जातात.

वारी नेहमी पायीच केली जाते. वारकरी संप्रदायात अनेक गुरू आहेत. त्यातील काही जण विविध मठांचे प्रमुख, कीर्तनकार, प्रवचनकार आहेत. साधूवृत्तीने वर्तणूक असल्यानं त्यांना सर्वजनांकडून सन्मान मिळतो. पंढरपुरात या महाराजांचे अनेक मठ असल्याने वारीच्या वेळी तिथे हजारो वारकरी राहतात. भक्ती आणि ज्ञानाचा समन्वय साधला जातो. हे मठाधिपती प्रवचनं, कीर्तनं करतात. अद्वैत वेदांताचा पुरस्कार करतात. इथे कीर्तनाबरोबर गोपालकाल्याचा उत्सवही रंगतो. या संप्रदायात सकाम भक्तीभाव दिसतो. वारकऱ्यांनी अनेक धर्मसंकटांमध्ये सुद्धा 'ग्यानबा-तुकाराम' हा मंत्र सोडलेला नाही. वारकरी संप्रदाय नेहमीच राजकारणापासून दूर राहिलेला आहे. या संप्रदायामध्ये उदारता, सहिष्णुता, चित्तशुद्धी आणि सर्वांप्रति आत्मियता आदी सात्त्विक गुण दिसून येतात.

वारी सर्वांचीच आहे. वारकरीपंथ हा समाजाचा पंथ आहे. त्यामध्ये कर्मकांड नाही. वारकरी संप्रदाय सर्वांना सामावून घेतो. त्यामुळेच वारकरी पंथ आणि वारी समाजातील सर्वांना आपलीशी वाटते. समाजातील सर्व स्तरांना सामावून घेतल्याने जाती-भेद उरतच नाही. भक्तीतील या पावनतत्त्वाची शक्ती आणि शरणागती सर्वांचा उद्धार करून जाते. आपण करतो ते प्रत्येक काम, प्रत्येक कर्म विठ्ठलाचं आहे अशी प्रत्येकाची धारणा असते. त्यामुळेच प्रत्येक कामाला गती येतेच शिवाय मनात सत्कृत्य करत असल्याची भावना राहते आणि समाधान मिळतं.

आता बदलत्या काळात, जागतिकीकरणाच्या झंझावातात वारीतही मोठे बदल होत आहेत. जुन्या पिढीबरोबर नव्या पिढीतील लोकही उत्साहाने वारीत सहभागी होत आहेत. वारकरी संप्रदायातील काही गटांनी पर्यावरणाला हानिकारक असणाऱ्या प्रकल्पाविरुद्ध चळवळी उभ्या केल्या आहेत. वारीच्या नव्या रूपाला सामोरं जाताना त्यामध्ये ग्रामविकास, पर्यावरण संरक्षण, जातीभेद निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आदी गोष्टींचा विचार करुन त्याविषयी प्रबोधन होत आहे. वारकरी संप्रदायानं आपला भक्तीभाव, सहिष्णूता आणि प्रवाही रूप कायम ठेवलं आहे. हे महात्म्य जाणूनच आपले तुकाराम महाराज म्हणतात,

**ऐसी चंद्रभागा ऐसे भीमातीर।**
**ऐसा विटेवर देव कोठे।।**
**ऐसे संतजन ऐसे हरिदास।**
**ऐसा नामघोष सांगा कोठे।।**
**तुका म्हणे आम्हा अनाथा कारणे।**
**पंढरी निर्माण केले देवे।।**

पांडुरंगाने आपल्यासारख्या अनाथांसाठी पंढरी निर्माण केलेली आहे याची जाणीव प्रत्येक वारकऱ्याच्या मनात असते. म्हणूनच तो पंढरीनाथाच्या दर्शनासाठी उत्सुक असतो.

## देव भावाचा भुकेला


बोल ज्ञानियाचे

देव भावाचा भुकेला असतो. भक्ताला भगवंतांच्या कृपेची आस असते त्याचप्रमाणे भगवंतालाही भक्ताकडून निरलस प्रेमाची आस असते. पुढील ओवीत भगवंताच्या याच भावाचं विवेचन केलं आहे. भगवंत आणि भक्त यांच्या नात्याचं विवेचन करताना माऊली म्हणतात,

**पै या भक्तासि माझे कोड।**
**मज तयाचे अनन्य गतींची चाड।**
**कां जे प्रेमळांचे साकडं।**
**आमुचिया घरी ।।**

तान्ह्या बाळाला आईच्या प्रेमाची गरज असते त्याप्रमाणे भगवंतालाही भक्ताच्या शुद्ध प्रेमाची आस असते. ईश्वर म्हणतो, सदा सर्वकाळ माझ्या ठिकाणी चित्त ठेवून प्रेमपूर्वक भजन करणाऱ्यांना मी बुद्धियोग देतो आणि त्याच्या योगाने ते माझ्या स्वरूपाला येऊन मिळतात.

बुद्धियुक्त होणं म्हणजे निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त करणारी वृत्ती जोपासणं. एकदा ती प्राप्त झाली म्हणजे मनुष्य कर्माच्या विळख्यात अडकत नाही. बुद्धीने स्वतःला परब्रह्माशी जोडून घेणं यालाच बुद्धियोग म्हणतात. अर्थात त्यासाठी बुद्धी आणि वैराग्य यांची सांगड घालता आली पाहिजे. बुद्धी आणि वैराग्याची सांगड घातल्यावर व्यक्ती भगवंतमय होऊन जाते. त्या रुपाशी एकरुप होते. अशा भक्तांच्या सर्व कृती ब्रह्मरूप होतात. आत्मज्ञानी पिंड आणि ब्रह्मांड यांचं ऐक्य अनुभवतात.



माऊली म्हणतात, 'लाडकं लेकरू खेळत असता आई त्याच्यावर प्रेमदृष्टी ठेवून असते. ती त्याच्या मागोमाग धावते आणि लेकरू मागेल तो खेळ त्याच्यापुढे ठेवते, त्याप्रमाणे भगवंतही भक्तांच्या इच्छेप्रमाणे उपासनेचे मार्ग वाढवतो. भक्त येऊन मिळतील अशा सर्व मार्गांचं तो प्रेमाने रक्षण करतो.' भक्तांना माझं प्रेम हवं असतं तद्वतच मलाही त्यांच्या अनन्यभावाची आवड असते, असं परमेश्वर सांगतो. माझ्या घरी प्रेमळ भक्तांचा दुष्काळ आहे. आम्ही सर्वस्व देऊन प्रेमळ भक्त घेतो असंही भगवंत कबूल करतो.

## इथे उंदरांची गर्दी

अजबगजब



भारतात हजारोंच्या संख्येनं रहस्यमयी मंदिरं आहेत. तिथे बघायला मिळणारे अद्‌भूत नजारे, चित्रविचित्र प्रथा-परंपरा आपल्याला कोड्यात टाकतात. त्यांचा उगम कसा आणि कधी झाला असेल हा प्रश्न सतावतोच त्याचबरोबर त्या का पडल्या असाव्यात हा विचारही मेंदू व्यापून टाकतो. राजस्थानातील बिकानेर येथे स्थित करनी माता मंदिरातील नजाराही अशाप्रकारे विचारास प्रवृत्त करणारा आहे. करनी मातेच्या या अनोख्या मंदिरात तसंच त्या परिसरात जवळपास २० हजार उंदरांचा वावर आहे. करनी मातेला दुर्गेचा अवतार समजतात. दररोज हजारोंच्या संख्येने भाविक आणि पर्यटक या मंदिराला भेट देतात आणि देवीची करुणा भाकतात. यामध्ये देवीच्या आराधनेबरोबरच प्रचंड संख्येने असणारे उंदीर बघणं



हेदेखील आकर्षणाचं केंद्र असतं.

इथे उंदरांना 'काबा' म्हणतात. अन्नाची व्यवस्था करणं तसंच त्यांचं संरक्षण करणं याकडे मंदीर व्यवस्थापन जातीने लक्ष पुरवतं. एरवी उंदीर हा आजार पसरवणारा जीव म्हणून कुप्रसिद्ध आहे. त्यामुळे घरात एखादा उंदीर शिरला तरी त्याला हुसकावलं जातं. उंदरांमुळे परिसर अस्वच्छ होतो. त्यांच्या वावराने संबंधित स्थळी एकप्रकारची दुर्गंधी पसरते. मात्र हे सगळे मुद्दे इथे गैरलागू ठरतात. इतक्या मोठ्या संख्येने उंदरांचा वावर असून या परिसरातील स्वच्छता प्रभावीत होत नाही. उंदारांमुळे इथे कोणताही आजार पसरल्याची नोंद नाही. इतकंच नव्हे तर मंदिर परिसरात दुर्गंधही जाणवत नाही. भाविकांना उंदरांच्या गर्दीतून वाट काढतच गाभाऱ्यापर्यंत पोहोचावं लागतं. त्यांना उंदरांनी चाखलेला प्रसाद दिला जातो. पण तोच अत्यंत श्रद्धाभावाने ग्रहण केला जातो. एखाद्या उंदराने पायावरुन जाणं अत्यंत शुभ समजलं जातं. त्यातही पांढरा उंदीर दृष्टीस पडणं परमभाग्याचं लक्षण समजतात.

अशी ख्याती असल्यामुळेच या मंदिराची 'मूषक मंदिर' अशी ख्याती आहे. ही करनी माता बिकानेर राजघराण्याची कुलदेवता आहे. त्यामुळे राजपरिवारातील सदस्यही नियमित देवीचं दर्शन घेण्यासाठी येतात.

## सत्त्वगुणांमधील सामर्थ्य

समर्थ उवाच

प्राचीन काळी कपिल मुनींनी सकळ विश्वातील प्रत्येक जीव सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी बनलेला आहे असं मत मांडलं जे भारतीय संस्कृतीत सर्वमान्य आहे. या तीन्ही गुणांना मिळून त्रिगुण म्हणतात. यातील रजोगुणाबाबत समर्थ रामदास स्वामी सविस्तर बोलतात. ते म्हणतात,

**माझे घर माझा संसार। देव कैंचा आणिला थोर। ऐस करी जो निर्धार। तो रजोगुण।।**
**माता पिता आणि कांता। पुत्र सुना दुहिता। इतुकियांची वाहे चिंता। तो रजोगुण।।**
**मी तरुण मी सुंदर। मी बलाढ्य मी चतुर। मी सकळांमध्ये थोर। म्हणे तो रजोगुण।।**

याद्वारे व्यक्तीमध्ये प्रामुख्याने जो गुण असेल त्याप्रमाणे त्याची प्रवृत्ती बनत जाते असं समर्थ सांगतात. गुणानुक्रमे सत्त्वगुण सर्वात श्रेष्ठ, रजोगुण मध्यम आणि तमोगुण सर्वात कनिष्ठ मानला जातो. ज्ञान, परोपकारी बुद्धी, समाधान, निस्वार्थीपणा आदी सत्त्वगुणाने प्राप्त होणारे सद्‌गुण आहेत. प्रापंचिक प्रवृत्ती, सुखासाठी धडपड, शौर्य आणि लढाऊ वृत्ती हे रजोगुण होत तर मद, मोह, लोभ, आळस, खल प्रवृत्ती ही तमोगुणाची लक्षणं आहेत. प्रत्येक माणसात यांच्या कमी-अधिक प्रमाणामुळे वासना आणि बुद्धी तयार होत असते. सत्त्वगुण सर्वोत्तम, तमोगुण नीचीचा तर रजोगुण मध्यम समजावा असं सांगून समर्थ म्हणतात की, सत्त्वगुण सर्वोत्तम असून त्यामुळे परम ईश्वरप्राप्ती होते. रजोगुण मध्यम असल्याने पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात जावं लागतं तर तमोगुणामुळे नशिबी अधोगतीच येते.



प्रत्येक माणसाने या त्रिगुणांची ओळख करुन घेणं आणि आत्मपरीक्षण करुन आपल्यात कोणते गुण आहेत हे जाणून घेणं गरजेचं ठरतं. प्रगतीपथावर जाण्यासाठी हे आत्मपरीक्षण साह्यभूत ठरतं. आचार्य विनोबा भावे या तीन्ही गुणांना संस्कृती, प्रकृती आणि विकृती म्हणत असत. ते म्हणत, आपण भुकेले असतानाही भाकरीतील तुकडा दुसऱ्याला देणं ही संस्कृती आहे, भूक लागल्यानंतर ती दुसऱ्याला न देता खाणं ही प्रकृती आहे आणि दुसऱ्याची भाकरी हिसकावून घेणं ही विकृती आहे. या विचारामधील मर्म ओळखायला हवं.

## अनुभव हाच गुरू

जीवनमंत्र



**खाली पेट, खाली जेब और झूठा प्यार...**
**ये आदमी को वो सबक सिखा देते हैं,**
**जो जिंदगी में बडे से बडा गुरू भी नहीं सिखा सकता...**

आयुष्यात अनेक गुरु भेटतात. लहानपणी आई-वडिलांकडून मूल्यशिक्षण मिळतं. शिक्षकांकडून पुस्तकी शिक्षण मिळतं. नोकरी-धंद्यानिमित्त संपर्कात येणारे वरिष्ठ आपल्याला त्या क्षेत्रातील ज्ञान शिकवून जातात. आध्यात्मिक गुरू ईश्वरभक्तीचं मर्म समजावून सांगतात. पण खरं सांगायचं तर या सर्वांपेक्षा अनुभव हाच माणसाचा सर्वात मोठा गुरू असतो. आयुष्यात पदोपदी येणारे अनुभव आपल्याला शहाणं करत असतात. जगण्याच्या प्रत्येक आयामांची, या जगातील कठोर नियमांची ओळख या अनुभवांमुळेच होते. खिशात पैसे नसताना, पोटात भुकेचा आगडोंब उसळलेला असताना आणि प्रेमात फसवणूक झालेली असताना आलेले अनुभव जगरहाटीचं कटु वास्तव सामोरं आणतात आणि त्यामुळेच आपल्याला जगण्याचं मर्म समजतं. खऱ्या अर्थाने हेच अनुभव आपल्याला जगण्याच्या गाभ्यापर्यंत नेतात. चांगल्या-वाईटाची पारख करणारी दृष्टी देतात. या ढोंगी जगात वावरण्यासाठी हवा तो चलाखपणा या अनुभवांमुळेच मिळतो. म्हणूनच अनुभवांवरुन मिळालेल्या शहाणपणाचा वापर करुन कृती करणारा, दुधाने जीभ पोळली की ताकही फुंकून पिणारा, येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करुन पुढे जाण्याची जिद्द ठेवणारा माणूस कधीही माघार घेत नाही. तो जिंकण्यासाठीच लढतो. हरला तरी प्रयत्नांमध्ये कोणतीही कसूर ठेवत नसल्यामुळे आलेल्या अपयशाचा हसत हसत स्वीकार करणं आणि आपल्या कमकूवत बाजू जाणून घेत त्या बलिष्ट करणं यास तो प्राधान्य देतो. त्याच्यासाठी अपयश ही यशाची पहिली पायरी ठरते.

## यात्रा जगन्नाथाची

आनंदयात्रा

भारतातील अनेक यात्रा जगप्रसिद्ध आहेत. जगन्नाथपुरीतील रथयात्रा त्यातीलच एक! आषाढाच्या शुक्ल पक्षातील द्वितीयेला या यात्रेस प्रारंभ होतो. यंदाची यात्रा लवकरच (१४ जुलै) सुरू होत आहे. भगवान जगन्नाथ, भाऊ बलराम आणि बहीण सुभद्रा यांचे रथ ओढून, त्यांना नगरभ्रमण घडवून ही यात्रा संपन्न होते. यात्रा जगन्नाथ मंदिरापासून सुरू होऊन गुण्डिचा मंदिरापर्यंत पोहोचते. कित्येक वर्षांपासून ही यात्रा अत्यंत भक्तिभावाने संपन्न होत आहे. या पवित्र रथयात्रेशी संबंधित अनेक कथा प्रचलित आहेत.

त्यातील एक अशी की, कलयुगाच्या सुरूवातीच्या काळात मालव देशावर इंद्रद्युम राजाचं राज्य होतं. तो भगवान जगन्नाथाचा निस्सीम भक्त होता. एक दिवस जगन्नाथाचं दर्शन घेण्यासाठी राजा नीलांचल पर्वतावर गेला मात्र त्याला देवाची प्रतिमा दिसली नाही. पण निराशावस्थेत परतत असतानाच, 'लवकरच मूर्तीस्वरुपात भगवान जगन्नाथाचं दर्शन घडेल' अशी आकाशवाणी त्याच्या कानी पडली. काही काळानंतर समुद्रकिनारी फिरत असताना राजाला लाटांवर तरंगणारे तीन विशाल ओंडके दिसले. त्या क्षणी पुन्हा एकदा आकाशवाणी झाली आणि जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या प्रतिमा बनवण्यासाठी देवतांचा शिल्पकार विश्वकर्मा प्रकट होत असल्याची सूचना राजाला मिळाली. अर्थातच त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. काही क्षणातच विश्वकर्मा समोर प्रकटला पण त्याने एक अट घातली. ती म्हणजे, तिन्ही मूर्ती पूर्ण एकांतात घडवल्या जातील. त्यादरम्यान कोणी आलं तर मी निघून जाईन. राजाने अट मान्य केली. अगदी एकांतात गुण्डिचा नामक परिसरात हे काम सुरू झालं. मात्र एकदिवस अनवधानाने राजानेच त्या जागी प्रवेश केला आणि त्याला पाहताच विश्वकर्मा अंतर्धान पावला. भगवान बलभद्र, जगन्नाथ आणि सुभद्रा यांच्या मूर्ती अपूर्ण राहिल्या. राजा खट्टू झाला. मात्र देवाने आकाशवाणीद्वारे, आपल्याला याच रुपात प्रतिष्ठापित करण्याची आज्ञा दिली. तेव्हा राजाने भव्य मंदिराची उभारणी करुन त्यात प्रतिमा प्रतिष्ठापित केल्या. जगन्नाथाने दिलेल्या आज्ञेनुसार या प्रतिमा वर्षातून एकदा निर्माणस्थळी नेल्या जातात. स्कंदपुराणातील उत्कल खंडात हा सर्व उल्लेख आढळतो. आजही भाविक श्रद्धापूर्वक जगन्नाथाचा रथ ओढतात.





## देवभूमी नेपाळ

तीर्थाटन

जगातील एकमेव हिंदू राष्ट्र म्हणजे नेपाळ. नेपाळला भारताचा 'धाकटा भाऊ' म्हटलं जातं. नेपाळनं हिंदू संस्कृतीचा समृद्ध वारसा जपला आहे. तेथील सर्वांगसुंदर मंदिरं याची साक्ष देतात. यातील काही महत्त्वाच्या मंदिरांविषयी...

✻ **पशुपतिनाथ मंदिर** – नेपाळची राजधानी काठमांडूपासून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बागमती नदीच्या काठावरील देवपाटन गावात पशुपतिनाथाचं मंदिर स्थित आहे. मोठा विस्तार असणाऱ्या या मंदिरात केवळ हिंदूनाच प्रवेश दिला जातो. युनेस्कोने जागतिक वारसा यादीत या मंदिराचा समावेश केला आहे.

✻ **जानकी मंदिर** – नेपाळच्या जनकपूरमध्ये हे मंदिर स्थित असून ते देवी सीतेला समर्पित आहे. या मंदिराची स्थापना टिकमगडची राणी वृषभानू कुमारी हिने १९११ मध्ये केली.

✻ **मुक्तीनाथ मंदिर** – हे मंदिर नेपाळमधील प्रमुख धर्मस्थळांपैकी एक आहे. बौद्ध आणि हिंदूधर्मीय या मंदिराला भेट देतात. इथे मनोभावे नमस्कार करणाऱ्याला मोक्षाची प्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.



✻ **मनोकामना मंदिर** – काठमांडूपासून १०५ किलोमीटरवर असणारं हे मंदिर गोरखा जिल्ह्यात आहे. या मंदिराला भेट दिल्यानंतर भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात.

# महामार्गांच्या माध्यमातून मिळेल रोजगार निर्मितीला चालना : नितीन गडकरी
# भंडारा बायपास व मौदा वाय-जंक्शनचे लोकार्पण



■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ५:** कुठल्याही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पाणी, वीज, वाहतूक व दळवळणाची साधने आणि संवादाची माध्यमे विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पायाभूत सोयीसुविधा उत्तम होणे गरजेचे असते. भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील महामार्गांचे जाळे सर्वांगीण विकासाला व रोजगार निर्मितीला चालना देणारे ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. भंडारा जिल्हा औद्योगिक, कृषी, पर्यटनाच्या दृष्टीने विकसित व्हावा, असा उद्देश असल्याचेही ते म्हणाले.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय तसेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संयुक्त विद्यमाने लोकार्पण व भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आला. १४.८० किलोमीटरचा भंडारा बायपास आणि मौदा वाय-जंक्शन सहापदरी उड्डाणपुलाचे भूमिपूजन नितीन गडकरी गडकरी यांच्या हस्ते झाले. त्याचवेळी मानेगाव व्हेहीकुलर ओव्हरपास, बापेरा ते तुमसर डांबरीकरण आणि खापा ते भंडारा मागार्चे डांबरीकरण कार्यक्रमाचे भूमिपूजन यावेळी झाले. या कार्यक्रमाला खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार संजय पुराम, आमदार राजू कारेमोरे, माजी खासदार सुनील मेंढे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी गडकरी म्हणाले, ह्यमाज्या विद्यार्थीदशेत भंडाऱ्यात अनेकदा स्कुटरने यायचो. येथून लाखनी व साकोलीपर्यंत कामासाठी जायचो. त्यावेळी वैनगंगेवरील जुना पूल पाण्याखाली यायचा. त्यामुळे वाहतूक बंद व्हायची. मंत्री झाल्यावर वैनगंगेवर मोठ्या पुलाची निर्मिती केली. आज केंद्रीय मंत्री म्हणून ७३५ कोटी रुपयांचा अतिशय आधुनिक बायपास आज भंडाऱ्याला देताना आनंद होतोय. बायपास नसताना सातत्याने मौदा आणि भंडारा येथे खूप अपघात व्हायचे. वाय जंक्शनलाही हीच स्थिती होती. मात्र, तिथेही पूल झाल्यामुळे अपघात थांबतील, असा विश्वास आहे.

### जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळाची क्षमता

भंडारा हा जंगलांचा जिल्हा आहे. येथील नवेगाव बांध व नागझिरा ही जंगले जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ होऊ शकतात. भंडारा जिल्ह्याच्या विकासात खनीज संपत्ती व वनांची मोठी भूमिका आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये रोजगाराची मोठी क्षमता आहे, असेही नितीन गडकरी गडकरी म्हणाले.

नागपूर ते भंडारा सहापदरी रस्त्याच्या कामाची सुरुवात लवकरच होईल, अशी घोषणाही नितीन गडकरी गडकरी यांनी यावेळी केली. भंडारा शहरातील जुन्या राष्ट्रीय महामागार्ला ९ किलोमीटरच्या सिमेंट कॉंक्रिट रोडसाठी शंभर कोटी रुपये मंजूर केले आहेत, अशी माहितीही नितीन गडकरी यांनी दिली.

# विद्यार्थी नात्याने नवीन विषयांचा प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे
# सरन्यायाधीश भूषण गवई



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** विविध आव्हानात्मक परिस्थितींचा सामना करतांना वेळप्रसंगी प्रत्येक नवीन विषयाचा विद्यार्थी या नात्याने प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

हॉटेल ताज महल पॅलेस येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर व तेजस्विनी गवई हे उपस्थित होते. यावेळी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालयातील लाईव्ह स्ट्रीमिंग प्रणालीचे तसेच वाय फाय सेवेचे उद्घाटन करण्यात आले.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात काम करतांना तळमळीने आणि सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. नव्या पिढीतील सहका-यांना सकारात्मक दृष्टिकोनाने प्रेरित करणे आणि त्यांच्यातील अंगभूत गुणांना अधिक सक्षम करणे हे वरिष्ठांचे कर्तव्य आहे. याबरोबरच काम आणि कार्यालयीन जबाबदाऱ्या यामध्ये संतुलन राखणेही गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने नव्याने उपलब्ध करून दिलेल्या आधुनिक सुविधा नागरिकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरतील असा विश्वास सरन्यायाधीश गवई यांनी व्यक्त केला. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांनी मनोगतात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कारकीर्दीचा गौरव केला.

# रेल्वे मार्गावर वन्यजीवांसाठी सुरक्षा उपाय



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५:** राज्यातील वनक्षेत्र आणि व्याघ्र भ्रमणमार्गामधून जाणाऱ्या आठ रेल्वे मार्गिकांवर वन्यजीवांच्या हालचाली सुकर होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची शिफारस भारतीय वन्यजीव संस्थानने (डब्लूआयआय) केली आहे. या आठ रेल्वे मार्गिकांमध्ये नागपूर-कटोल, नागपूर-बुट्टीबोरी-वर्धा, देव्हाडी-गोबरवाही, गोंदिया-वडसा, वडसा-नागभीड-मूल, मूल-चंद्रपूर आणि चंद्रपूर-राजुरा-कागजनगर यांचा समावेश आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी नुकत्याच प्रकाशित केलेल्या एलिफंट अँड अदर वाईल्डलाईफ ट्रेन कॉलिजन ऑन व्हनरिबल स्ट्रेटेचेस इन इंडिया' अहवालात या शिफारसी करण्यात आल्या आहे. विदर्भातील आठ रेल्वे मार्गिकांवर १२५ लेव्हल क्रॉसिंग, ५१ पुलांचा विस्तार, चार ठिकाणी कुंपण, नऊ ठिकाणी अंडरपास आणि एका ठिकाणी ओव्हरपास बांधण्याच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत.

प्रोजेक्ट एलिफंट'अंतर्गत एलिफंट अँड अदर वाईल्डलाईफ ट्रेन कॉलिजन ऑन व्हनरिबल स्ट्रेटेचेस इन इंडिया' हा अहवाल तयार करण्यात आला आहे. यासाठी डब्लूआयआय'च्या शास्त्रज्ञांनी वन विभाग आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबत १४ राज्यांमधील वनक्षेत्र आणि व्याघ्र व हत्ती भ्रमणमार्गामधून जाणाऱ्या १२७ रेल्वे मार्गिकांचे सर्वेक्षण केले. त्यामधील ७७ रेल्वेमार्गिकांवर उपाययोजना करण्याची गरज त्यांना जाणवली.

## ॲग्रोव्हिजन तर्फे आज विशेष कार्यशाळा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५:** शेतीमध्ये आधुनिक विज्ञानाचा वापर करून उत्पादन व शाश्वतता वाढवण्याच्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून ॲग्रोव्हिजनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर रविवार, दि. ६ जुलैला विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता एनबीबीएस सभागृह, अमरावती रोड नागपूर येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती मिळणार आहे.



■ **नागपूर :** उपराजधानीत शनिवारी सकाळी एक थरार पाहायला मिळाला. सिव्हील लाईन परिसरात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर माजी मंत्री अनिल देशमुख यांच्या बंगल्यानजिक एक मद्यधुंद युवकाने कारसह रस्ता दुभाजकाला धडक दिली. सकाळी ९ च्या सुमारास घडलेल्या या अपघातात युवकाला फारसे लागले नसले तरी कारचे मात्र नुकसान झाले.

# 'म' म्हणजे मराठी नाही, महापालिका!
## ठाकरे बंधूच्या विजयी सभेवर बावनकुळेंची प्रतिक्रिया



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची बहुचर्चित विजयी सभा मुंबईत पार पडली. अपेक्षेप्रमाणे ती ग्रॅण्ड सभा झाली. ठाकरे शैलीत दोन्ही ठाकरे बंधूनी महायुती सरकावर टीका केली. त्यावर भाजपकडून प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यानी एक्सवर त्यांची प्रतिक्रिया दिली.

बावनकुळे म्हणतात मराठीच्या गोंडस नावाखाली आज उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही.

मराठी भाषा ही केवळ भावनांमध्ये उभी राहणारी अस्मिता नाहीतर ती धोरणात दिसली पाहिजे. पण तुम्ही मुंबईत सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं आणि आता सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम करत आहात. उद्धव ठाकरेंच्या भाषणातून स्पष्ट होतंय की, त्यांचा खरा अजेंडा म म्हणजे मराठी नाही, तर म म्हणजे महापालिका आहे!

यांचं मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी आहे. जनतेनं आता हा दुटप्पीपणा ओळखला आहे.

# दोन दुचाकींची समोरासमोर धडक
# एकाचा मृत्यु

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ५:** कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत सालवा येसंबा फाटा जवळ दोन दुचाकी वाहनात समोरासमोर जोरदार धडक झाल्यने अपघातात एकाचा मृत्यु झाला.

सोमराज अशोक गिरी (३५) रा.रेवराल यांचा भासरा दुर्गेश गोविंद वैकुडे (१८) रा.सिल्ली तिरोडा याचे अग्नीवीर परिक्षा असल्याने चुलत भाऊ सुभाष प्रभु गिरी (३२) रा.सिल्ली तिरोडा हे त्याला परिक्षा देण्याकरिता नागपुर येथे सोमवार (दि.३०) जुन रोजी होंडा शाईन दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० सीके ७१०९ ने घेऊन गेले आणि जास्त पाऊस येत असल्याने मामा महेश सरोदे रा.नागपुर यांचा घरी थांबले.

मंगळवार (दि.१) जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता च्या दरम्यान सोमराज गिरी घरी असतांना त्यांना दुर्गेश वैकुडे यानी फोन करुन सांगितले कि सालवा येसंबा फाटा जवळ अपघात झला आहे आणि सुभाष गिरी गंभीर जख्मी झाला आहे. आम्ही वानखेडे हॉस्पीटल येथे उपचारा करिता घेवुन जात आहे. सोमराज गिरी वानखेडे हॉस्पीटल येथे पोहचला असता त्याला चौधरी हॉस्पीटल कामठी येथे घेऊन गेल्याची माहिती मिळाली. चौधरी हॉस्पीटल येथे पोहचला असता त्याला माहिती मिळाली कि सुभाष गिरी याला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

गोविंद वैकुडे आणि सुभाष गिरी हे होंडा शाईन दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० सीके ७१०९ ने नागपुर वरुन सायंकाळी ५:३० वाजता रेवराल येथे जाण्याकरिता निघाले व ७ वाजता च्या दरम्यान सालवा येसंबा फाटा जवळ समोरुन येणाऱ्या पॅशन प्रो दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० बीटी ०३२७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजी पणाने चालवुन कोणतेही सिग्नल न देता आमरो समोर जोरदार धडक दिली. त्यामुळे सुभाष गिरी आणि पॅशन प्रो दुचाकी वाहन चालक वाहना वरुन खाली सत्यावर पडले. सुभाष गिरी याला डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याने उपचारा करिता चौधरी हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन त्याला मृत घोषित केले.

